केडगाव, अहिल्यानगरमध्ये
प्लॉट हवाय? प्लॉट विकायचा?
घर हवंय? घर विकायचंय?
जमीन हवी ? जमीन विकायचीय?
SHIVAM PROPERTIES
* ३० वर्षांची विश्वसनीय सेवा *
शिवम प्रॉपर्टीज
संपर्क - 9822116347, 9881620700

RNI No. 6153/57

समाचार
SAMACHAR

Volume - 75 | Issue- 81 | Marathi Daily | Wednesday 25/11/2026 | Pages - 6 | Price- Rs. 3





उठाठेव
– विवेक मेहेत्रे



खरं तर माझा फोन टॅप झालेला नाहीय... पण त्यानिमित्ताने सरकारवर टीका करताच देशभर प्रसिध्दी मिळतेय ते काय कमी आहे?

निवडक

पुण्यात दिवसाढवळ्या कोर्टाबाहेर गोळीबार

पुणे, दि.२५– विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यातील शिवाजीनगर कोर्टाबाहेर भरदिवसा एका व्यक्तीची आधी गोळीबार करत नंतर कोयत्याने वार करत हत्या करण्यात आल्याची घटना आज (दि.२५) रोजी दुपारी घडली आहे. शिवाजीनगर न्यायालयाच्या गेट क्रमांक ४ परिसरात ही घटना घडली असून, सहा जणांकडून ही हत्या करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मंदार किवळे असे हत्या करण्यात आलेल्या युवकाचे नाव आहे. तो २०२५ मध्ये कात्रजमध्ये हत्या झालेल्या प्रकरणातील आरोपी असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. चार दिवसांपूर्वीच तो जामीनावर सुटला होता, त्यानंतर त्याची हत्या करण्यात आल्याची माहिती मिळत आहे. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, दोन दुचाकींवरून आलेल्या सहा ते सात हल्लेखोरांमधील एका संशयित आरोपीने पिस्तुलातून गोळीबार केला. त्यानंतर जीव वाचवण्यासाठी तो शिवाजीनगर कोर्ट ते फॅमिली कोर्टाच्या दिशेने पळत सुटला. मात्र, हल्लेखोरांनी पाठलाग करून त्याच्यावर कोयत्याने सपासप वार केले. यावेळी किवळे घाबरून खाली बसल्यानंतरही हल्लेखोरांनी वार सुरूच ठेवले. यात त्याचे दोन्ही हात शरीरापासून वेगळे झाले. हल्ल्यानंतर आरोपी दुचाकीवरून पसार झाले.

हवेचा गुणवत्ता निर्देशांक दीडशे पार

नगरच्या हवेची गुणवत्ता बिघडली!



समाचार/नगर-दि.२५

जिल्ह्यात गुलाबी थंडीची चाहूल लागली असतानाच दुसरीकडे प्रदूषणाच्या विळखा वाढत आहे. गेल्या काही दिवसांपासून नगर शहर आणि परिसरातील हवेचा दर्जा सातत्याने खालावत असून, आज (दि. २५ नोव्हेंबर) शहराचा हवा गुणवत्ता निर्देशांक १२४ ते १५२ दरम्यान नोंदवला गेला आहे. ही पातळी अस्वास्थ्यकर आणि संवेदनशील गटांसाठी घातक या श्रेणीत मोडत असल्याने लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि दम्याचा त्रास असलेल्या रुग्णांसाठी ही धोक्याची घंटा ठरली आहे.

आज कमाल तापमान ३० अंश सेल्सिअस तर किमान तापमान १८ अंश सेल्सिअसच्या आसपास आहे. दरम्यान, नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीपासूनच नगरच्या हवेची गुणवत्ता खालावली असून, या महिन्याची सरासरी एक्यूआय पातळी १५५ वर पोहोचली आहे. रात्रीच्या वेळी तापमान घटल्याने थंड हवा जड होऊन जमिनीलगत राहते. वाऱ्याचा वेग मंदावल्याने वाहनांचा धूर आणि धूळ वरच्या थरात न जाता शहरावर धुक्यासारखा थर तयार करत आहे. शहरातील रस्त्यांची सुरू असलेली कामे, अपूर्ण रस्ते, खाजगी बांधकामे आणि त्यातून उडणारी धूळ रोखण्यासाठी कोणत्याही ठोस उपाययोजना होताना दिसत नाहीत. शहरातील प्रमुख चौकांमधील वाहतूक कोंडीमुळे वाहनांतून बाहेर पडणारा धूर आणि अनेक भागांत उघड्यावर जाळला जाणारा कचरा यांमुळे प्रदूषणात मोठी भर पडत आहे. प्रदूषित हवेत दीर्घकाळ श्वास घेतल्याने घशात खवखव, डोळ्यांची जळजळ, सततचा खोकला आणि दम लागणे यासारख्या तक्रारी वाढतात. बांधकाम व्यावसायिकांना हिरव्या जाळ्या लावणे बंधनकारक करणे आणि कचरा जाळणाऱ्यांवर कडक दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहे. अन्यथा, डिसेंबर आणि जानेवारीच्या कडाक्याच्या थंडीत नगरच्या हवेची गुणवत्ता अधिकच खालावण्याची भीती अभ्यासकांकडून व्यक्त केली जात आहे.



शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे तुळशी विवाह उत्साहात संपन्न झाला. यावेळी महंत संगमनाथ महाराज तसेच सेवा मंडळाचे सदस्य व गणेश भक्त उपस्थित होते. (छाया- राजू खरपुडे ,नगर)

महावितरणकडून शुक्रवारी शटडाऊन

शहरास एक दिवस उशिराने होणार पाणीपुरवठा

समाचार/नगर-दि.२५

महवितरणकडून शुक्रवार दि.२७ रोजी शहर पाणीपुरवठा योजनेच्या महत्वाच्या कामासाठी शटडाऊन घेण्यात येणार असल्याने शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगरास एक दिवस उशिराने पाणीपुरवठा होणार आहे. शुक्रवारी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या काळात शटडाऊन असणार आहे. दरम्यानच्या काळात मुळानगर, विळद येथून होणारा पाणीउपसा बंद राहणार असल्याने पाण्याच्या टाक्या भरता येणार नाहीत. शुक्रवारी सकाळी ११ नंतर बोल्हेगाव, नागापूर, गुलमोहर रोड, पाईपलाईन रोड, लक्ष्मीनगर, सूर्यनगर, निर्मलनगर, मुकुंदनगर, स्टेशन रोड, आगरकर मळा, केडगाव, नगर-कल्याण रस्त्यावरील शिवाजीनगर या भागास पाणीपुरवठा होणार नाही. या भागाला शनिवारी पाणीपुरवठा केला जाणार आहे. मंगलगेट, रामचंद्रखुंट, झेंडीगेट, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, दाळमंडई, काळूबागवान गल्ली, धरती चौक, बंगाल चौकी, माळीवाडा, कोठी, गुलमोहर रोड, प्रोफेसर कॉलनी परिसर, सिव्हील हडको, प्रेमदान हडको, टीव्ही सेंटर परिसर, म्युनिसिपल हडको, सारसनगर, बुरूडगाव रोड, बालिकाश्रम रोड या भागास शनिवारऐवजी रविवारी

(पान ३ वर)

७९ हजारांचा मुद्देमाल जप्त अवैध गुटखा विक्रेत्यावर छापा

समाचार/नगर-दि.२५

मोपेडवरून अवैध सुगंधी तंबाखू आणि पानमसाल्याची विक्री करण्यासाठी येणाऱ्या एका तरुणावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून धडक कारवाई केली. या कारवाईत आरोपीला ताब्यात घेतले असून, गुटखा आणि दुचाकीसह एकूण ७९ हजार ८७६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार अभिजीत अरकल, रणजीत जाधव, अजिनाथ पाखरे व बाळासाहेब गुंजाळ यांच्या पथकाने ही कारवाई केली. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कोपरगाव शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत होते. यादरम्यान, जुना टाकळी रोड, गिरमेसिटी श्रीनगर परिसरातून एक इसम मोपेडवरून प्रतिबंधित सुगंधी तंबाखू व पानमसाला विक्रीसाठी येत असल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी जुने टाकळी रोडवरील बाबा चौक येथे पंचासमक्ष सापळा रचला. संशयित मोपेड



(क्रमांक एमएच-१७-बीआर-९२३०) येताच पथकाने तिला थांबवून तपासणी केली असता, गाडीवरील गोणीमध्ये मोठ्या प्रमाणात सुगंधी तंबाखू व पानमसाला आढळून आला. पोलिसांनी याप्रकरणी सागर जयराम ताकवले (वय २९, रा. सुभाषनगर, कोपरगाव) याला ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून २९ हजार (पान ३ वर)

एलसीबीची कारवाई; ६.६० लाखाचा मुद्देमाल हस्तगत

कंटेनर अडवून चालकाला लुटणारी टोळी गजाआड

समाचार/नगर-दि.२५



पारनेर तालुक्यातील पळशी फाटा येथे कंटेनरला कार आडवी लावून चालकाला मारहाण करत लुटणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या तीन दिवसांत पर्दाफाश केला आहे. या कारवाईत दोघा आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली कार आणि मोबाईल असा एकूण ६ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अनंत सालगुडे, अंमलदार अतुल लोटके, सोमनाथ झांबरे, अमोल आजबे, प्रकाश मांडगे, फुरकान शेख, प्रशांत राठोड आणि संभाजी कोतकर यांच्या पथकाने पार पाडली.

लातूर जिल्ह्यातील चापोली (ता. चाकूर) येथील कंटेनर चालक महादेव वसंत कांबळे (वय २९) हे २१ नोव्हेंबर २०२६ रोजी आपला कंटेनर घेऊन पारनेर तालुक्यातील पळशी फाटा येथून जात होते. यावेळी अज्ञात आरोपींनी आपल्या कारने कंटेनरला आडवे मारून वाहन थांबवले. त्यानंतर चालक कांबळे यांना बेदम मारहाण करत त्यांच्याकडील २० हजार रुपये रोख रक्कम आणि मोबाईल असा ऐवज जबरीने हिसकावून पोबारा केला. या प्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी उपनिरीक्षक अनंत सालगुडे व पथकाला तपासाच्या सूचना दिल्या. २४ नोव्हेंबर रोजी पथक समांतर तपास करत असताना, गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे हा गुन्हा पळवे बुद्रुक (ता. पारनेर) येथील दत्तात्रय कळमकर याने साथीदारासह केल्याचे निष्पन्न झाले. आरोपी दत्तात्रय बाळासाहेब कळमकर (वय ३६, रा. विठ्ठलनगर फेज २, शिरूर, जि. पुणे; मूळ रा. पळवे, ता. पारनेर) हा शिरूर येथे असल्याची माहिती मिळताच पथकाने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. (पान ३ वर)



वाडिया पार्क, टिळक रोड परिसरात मोठी कारवाई

मनपाकडून अतिक्रमणांवर हातोडा

समाचार/नगर-दि.२५

शहरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी आणि रस्ते मोकळे करण्यासाठी महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाने आज, बुधवारी (दि. २५) वाडिया पार्क, आयुर्वेद कॉर्नर आणि टिळक रोड परिसरातील टपऱ्या व रस्त्यावर मांडलेले साहित्य हटवण्यात आले. शहरातील अत्यंत वर्दळीच्या मानल्या जाणाऱ्या टिळक रोड, आयुर्वेद कॉर्नर आणि वाडिया पार्क परिसरात पदपथांवर तसेच रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले होते. याची दखल घेत महापालिका (पान ३ वर)

डॉलरच्या तुलनेत १५ दिवसांत १.६४ टक्क्यांची मजबुती

कच्च्या तेलाच्या किमती घटल्या; रुपया वधारला!

नवी दिल्ली – मध्य पूर्वेतील युद्धजन्य परिस्थितीमुळे भडकलेल्या कच्च्या तेलाच्या किंमती नोव्हेंबर महिन्यात घटू लागल्याने त्याचा परिणाम रुपया वधारण्यात झाला आहे. गेल्या १५ दिवसांत डॉलरच्या तुलनेत भारतीय चलन रुपया १.६४ टक्क्यांनी मजबूत झाला आहे. दरम्यान देशात परदेशी गुंतवणूक वाढल्याने रुपयाची मागणी वाढली असून परिणामी रुपयाला मोठी बळकटी मिळत असल्याचे सांगितले जाते.

गेल्या महिन्याच्या सुरुवातीला रुपया नीचांकी पातळीवर पोहोचला होता. मध्य पूर्वेतील युद्धजन्य परिस्थितीमुळे कच्च्या तेलाच्या किमतीही मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या. आशिया खंडात रुपयाने वाईट प्रदर्शन केले होते. हाच रुपया आता डॉलरच्या तुलनेत मजबूत होत चालला आहे. डॉलरच्या तुलनेत रुपया आज ०.२५ टक्क्यांनी सावरला आहे. ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीला रुपया ९६.३७ म्हणजेच सर्वकालीन नीचांकी पातळीवर होता. आज रुपया डॉलरच्या तुलनेत ९२.६२ वर पोहोचला आहे. त्यामुळे ७ ऑक्टोबरपासून ते आजपर्यंत रुपया जवळपास साडेतीन ते चार रुपयांनी मजबूत झाल्याचे दिसून येते.



रुपयाला बळकटी मिळण्यामागे कच्च्या तेलाच्या घसरलेल्या किंमतीही कारणीभूत ठरल्या आहेत. मध्य पूर्वेतील युद्धजन्य परिस्थितीमुळे ऑक्टोबरमध्ये कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल ११५ डॉलरच्या पुढे भडकल्या होत्या. मात्र गेल्या महिनाभरात कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल ९१.४० डॉलरवर घसरल्या आहेत. कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण झाल्याने त्याचा परिणाम भारताचा आयात खर्च कमी होण्यात झाला आहे.

पर्यायाने डॉलरची मागणी कमी झाल्याने रुपया मजबूत होण्यास मोठी मदत झाली आहे. भारताची तेजीने वाढणारी अर्थव्यवस्था आणि देशात परदेशी गुंतवणूक वाढत असल्याने रुपयाची मागणीही वाढते आहे. त्यामुळे रुपयाला मोठी बळकटी मिळत असल्याचे सांगण्यात येते.

संपादकीय

धडा निवडणुकीचा

केंद्रात भाजपाप्रणित एनडीएचे तर राजस्थानमध्ये भाजपाचे सरकार आहे. विधानसभा निवडणूक असो किंवा जिल्हा परिषद पंचायत समित्यांची निवडणूक असो, भाजपाचा प्रचाराचा जोर नेहमीच 'डबल इंजिन सरकार' या संकल्पनेवर असतो. केंद्रात आणि राज्यात एकाच पक्षाचे सरकार असेल तर विकासाला गती मिळते, असे भाजपा ठसवून सांगत असते. राज्यातील निवडणुकांमध्ये भाजपाला डबल इंजिन सरकार या वास्तवाचा राजकीय लाभ मिळतो. मात्र राजस्थानमध्ये नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीमध्ये मतदारांनी 'डबल इंजिन'चे वास्तव नाकारले. ग्रामीण भागात काँग्रेसची सरशी झाली आणि भाजपाची पिछेहाट झाली. राजस्थानमधील ग्रामीण जनतेने काँग्रेसवर विश्वास दाखवला. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांवर काँग्रेस पक्षाने वर्चस्व प्राप्त केल्याने मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्या नेतृत्वाखालील भाजपा सरकारला मोठा धक्का बसल्याचे मानले गेले. राजस्थानमध्ये जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीत भाजपाची मोठी पिछेहाट झाली. मुख्यमंत्र्यापासून अनेक मंत्र्यांच्या मतदारसंघात भाजपाला पराभव पत्करावा लागला. तीन वर्षांपूर्वी याच राज्यात काँग्रेसचा पराभव झाला आणि जिकडे तिकडे भाजपा असे वातावरण निर्माण झाले. पंजाला हटवून कमळ आले. पण आता ग्रामीण भागातील मतदार भाजपाला कंटाळला आहे की काय, असा प्रश्न पडतो. येथे भाजपाला जनतेने का नाकारले, मोदींचा करिष्मा का चालला नाही, मुख्यमंत्री भजनलाल शर्मांचे नेतृत्व जनतेला पसंत पडले नाही का या प्रश्नांवर आत्मचिंतन करण्याची वेळ भाजपवर आली आहे. भाजपविरोधात नकारात्मक भावना निर्माण होत असल्याचा अंदाज पक्षनेतृत्वाला आला नाही का, असा सवाल आता विचारला जात आहे. राजस्थानच्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमधील पराभव हा भाजपा आणि मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्यासाठी वाईट आणि धक्कादायक घटना आहे. मतदारांना कायमचे गृहित धरून चालत नाही, हा संदेश राजस्थानने पुन्हा एकदा दिला आहे. एवढेच नव्हे, तर भाजपाच्या दिग्गज नेत्यांच्या मतदारसंघांमध्ये काँग्रेसने शिरकाव केला आहे. त्यामुळे यापुढील राज्याची विधानसभा निवडणूक सोपी नाही, हाच संदेश भाजपाला या निकालाने दिला आहे. राजस्थानमधील जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांमधील काँग्रेसला मिळालेला प्रचंड विजय हा भाजपाला मुळीच अपेक्षित नव्हता. निकाल लागलेल्या ३७ पैकी २३ जिल्हा परिषदांवर काँग्रेसने आपला झेंडा फडकवला. भाजपाला केवळ सहा जिल्हा परिषदांवर विजय मिळाला आहे. विरोधी पक्षाने पंचायत समित्यांमध्ये भाजपाच्या तुलनेने जवळपास ७० टक्के जागांवर कब्जा प्राप्त केला आहे. पंचायत समित्यांच्या निवडणुकीमध्ये काँग्रेसचे राज्यात ३,७५८ सदस्य निवडून आले तर भाजपाचे २,२१३ सदस्य विजयी झाले. जिल्हा परिषदांमध्ये विरोधी पक्षांचे ७९४ सदस्य निवडून आले तर भाजपाचे ३५७ विजयी झाले. राज्यातील ३७ जिल्ह्यांमधील पंचायत समित्यांवर ७५४३ जागा असून जिल्हा परिषदांमध्ये १२७५ जागांसाठी निवडणूक झाली होती. अन्य चार जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीतील मतमोजणी बाकी आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीमध्ये आणखी मोठे यश मिळेल, अशी अपेक्षा काँग्रेस बाळगून होती. जयपूरमधील संगनेर हा मुख्यमंत्री भजनलाल शर्मा याचा विधानसभा मतदारसंघ आहे. संगनेर पंचायत समितीच्या १५ पैकी आठ जागांवर हनुमान बेनीवाल यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकतांत्रिक पक्षाने विजय मिळवला. काँग्रेस आणि भाजपाच्या पदरात प्रत्येकी तीन जागा पडल्या. मुख्यमंत्र्यांचा गृह जिल्हा असलेल्या भरतपूरमधे जिल्हा परिषद निवडणुकीत काँग्रेसने ३१ पैकी २१ जागांवर विजय मिळवला. भाजपाने नऊ जागा जिंकल्या तर एक जागा राष्ट्रीय लोकतांत्रिक पक्षाला मिळाली. राज्याचे नगरविकास आणि गृहनिर्माण मंत्री जाबरसिंग खर्रा यांच्या पत्नीसह परिवारातील चौघांचा श्रीमाधोपूर पंचायत समितीमध्ये पराभव झाला. भाजपमधील घराणेशाहीला मतदारांनी धडा शिकवला. कॅबिनेट मंत्री राज्यवर्धन राठोड यांच्या मतदारसंघातील झोलवारा पंचायत समितीमध्ये भाजपाला १५ पैकी एकाच जागेवर विजय मिळाला. चुरूमधे भाजपाचे मंत्री राजेंद्र राठोड यांनी त्यांचा मुलगा व सून यांच्या प्रचारासाठी मुस्लीम मतदारांना आकर्षित करण्यासाठी कलमा वाचला होता. पण जिल्हा परिषदेत काँग्रेसला बहुमत मिळाले. नागौर जिल्हा परिषदेत राष्ट्रीय लोकतांत्रिक पक्षाने आश्चर्यकारक यश मिळवले. जिल्हा परिषदेच्या ३७ पैकी १९ जागा या पक्षाने जिंकल्या. काँग्रेसने ११ जागांवर तर भाजपाने सात जागांवर विजय मिळवला. राष्ट्रीय लोकतांत्रिक पक्षाचे जिल्हा परिषदांमध्ये ५१ तर पंचायत समित्यांमधे ४९७ सदस्य निवडून आले आहेत. राज्यातील एकूण ४१ जिल्ह्यांमधील दोन कोटी ७० लाख मतदारांनी या निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावला. या निवडणुकीत काँग्रेसला कौल मिळाला. या निकालाकडे दुर्लक्ष करणे भाजपाला परवडणार नाही. राज्यातील दिग्गजांना दूर ठेवून प्रथमच आमदार म्हणून निवडून आलेल्या भजनलाल शर्मा यांना थेट मुख्यमंत्री करण्याचा मोदी-शहांचा निर्णय चुकला तर नाही, अशी चर्चा आता सुरू झाली आहे. राजस्थानमधील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निकालांचे लोकसभेतील विरोधी पक्षनेते नेते राहुल गांधी आणि काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी स्वागत केले आहे. पंचायत समित्यांचे अधिकार कमी केल्यामुळे ग्रामीण जनतेने भाजपाला नाकारले असे त्यांनी म्हटले आहे. चलनवाढ, बेरोजगारी, स्थलांतर या मुद्यांकडे भाजपाने दुर्लक्ष केल्यामुळे मतदारांनी भाजपावरील नाराजी मतदानातून व्यक्त केली, असे काँग्रेसने म्हटले आहे. भाजपाचे दिवस भरले आहेत, या पक्षाने आता गाशा गुंडाळण्याची तयारी करावी, अशी प्रतिक्रिया माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी व्यक्त केली. राज्यात सर्वमान्य आणि भक्कम नेतृत्व नसल्यास केवळ मोदींच्या करिष्म्यावर लोक मतदान करणार नाहीत हा संदेश या निकालाने दिला आहे.

प्रा. अनुरिता झगडे यांचा हिरकणी पुरस्काराने गौरव



समाचार/नगर-दि. २५

महिला अत्याचार विरोधी कार्य आणि प्रेरणादायी समुपदेशनाच्या क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल मेहेर इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या प्रा. अनुरिता झगडे यांना राज्यस्तरीय हिरकणी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

निमगाव वाघा (ता. नगर) येथील स्व.पै.किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय व नाना डोंगरे व्यायाम शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ९ व्या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला.

नवरात्र उत्सवानिमित्त कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यासाठी या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. परिवार मंगल कार्यालय, निमगाव वाघा येथे झालेल्या या सोहळ्यात महिला संरक्षण, महिला अत्याचार विरोधी जनजागृती आणि महिलांमध्ये धाडस निर्माण करण्यासाठी प्रेरणादायी व्याख्याने देणाऱ्या प्रा. झगडे यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पक्ष्यांसाठी बर्ड फीडरचे वाटप



समाचार/नगर-दि.२५

यंदा पाऊस कमी झाला आहे. दुष्काळाची छाया संपूर्ण महाराष्ट्रासह जिल्ह्यावर पडली आहे. माणसांसोबतच मुक्या पक्ष्यांनाही अन्न-पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. ही गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन अहिल्यानगरचे पर्यावरण दूत व भाऊसाहेब फिरोदिया शाळेचे शिक्षक सतीश गुगळे यांनी अमी जीवदया या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून एक स्तुत्य पुढाकार घेतला आहे. पक्षांना धान्य व पाणी पिण्यासाठी बर्ड फिडरचे मोफत वाटप करण्यात येत आहे.

बर्ड फीडर म्हणजे पक्षांसाठी खास तयार केलेले एक साधन. यामध्ये वरच्या बाजूला पाणी आणि खालच्या बाजूला धान्य ठेवण्याची सोय असते. घराच्या गॅलरीत, खिडकीत, अंगणातील झाडावर, शाळा, मंदिर, सोसायटीच्या आवारात हे बर्ड फीडर सहज लावता येते. त्यामुळे पक्षांना सहज अन्न-पाणी मिळते आणि त्यांचा जीव वाचतो.

या उपक्रमांतर्गत सतिश गुगळे हे अनेक कुटुंबांना प्रत्यक्ष भेटून बर्ड फीडरचे वाटप करत आहेत.

द सेकंड चॉईस

लता मंगेशकरमुळे सुमन कल्याणपूर ही सुरेल गायिका मागे पडली असा वादविवाद बऱ्याच फिल्मी पत्रकारांनी रंगवला होता. पण श्रोत्यांना सर्वच गायक गायिका आवडतात. तरीदेखील रफी व लता एकत्र आले की बहार यायची. असो

त्याकाळात लो बजेट किंवा सी ग्रेड जादुई, तसेच पोषाखी किंवा धार्मिक चित्रपट निघायचे. त्यांच्या बजेट नुसार त्यांचे संगीतकार ठरवलेले असायचे. लता ही सर्वात बिझी गायिका असल्याने तिचा पर्याय म्हणून सुमन कल्याणपूरला पहिली पसंती. पण रफी साहेब मात्र सिनेमाचा निर्माता छोटा असो बडा, सर्वांसाठी गायला तयार. आज रफी व सुमन कल्याणपूर यांच्या युगलगीतांचा विषय.



१९५५ साली 'श्रीकृष्ण भक्ती' या चित्रपटातील 'सावन मेघ उडे' (संगीत चित्रगुप्त) या गाण्यासाठी एकत्र आले. हातिमताई मधील 'जाने वाले खुदा को रहमतोका तुम्हे साया' हे गाणं तेव्हा खूप गाजलं होतं. 'मिस बॉम्बे' हे नाव देखील कुणी फारसं ऐकले नसेल पण यातील 'दिन हो या रात रहे हम तेरे साथ, ये हमारी मर्जी हे' गाणं मात्र अनेकवेळा ऐकलेलं असेल. हंसराज बहलते या 'मिस बॉम्बे' मध्ये रफी सुमनला तीन युगलगीते दिली व तिन्ही टॉप. त्यानंतर 'नील मणी' 'पोस्ट बॉक्स ९९९', 'लाईट हाऊस', 'सैर-ए-परिस्तान', 'ब्लॅक कॅट', 'एअरमेल', 'चंद्रमुखी' वगैरे अनेक चित्रपटात रफी व सुमनची अनेक सुमधूर युगलगीते होती, पण या चित्रपटांचा दर्जा सुमार असल्याने ते कधी आले व कधी गेले हे पब्लिकला कळलं नाही व गाणीही ऐकायला मिळाली नाही. साधनाचा पहिला सिनेमा 'लव्ह इन सिमला' याला इक्बाल कुरेशीचं संगीत. यातल 'हसीनो की सवारी है ये हसीनो की सवारी' हे ड्युएट भन्नाट होतं. सुमनला घेतलेला हा पहिला ए ग्रेड सिनेमा. 'फर्स्टलव्ह' नावाचा मेहमूद नायक असलेला एक सिनेमा. त्यातील 'वो देखो आई बहारे लाई' हे युगलगीत अतिशय सुंदर. प्रदीप कुमार, मीनाकुमारीच्या 'आरती मधील' 'आजा आजा आ रे बलम वादा करके तू' हे एकमेव रफी सुमनचं युगलगीत वगळता बाकी सबकुछ लता, और रफी. बचपन नावाचा एक चित्रपट १९६२ चा. याला सरदार मलिकचं संगीत. यातील 'मेरे हम ओ सनम तू जहां मैं वहां' हे युगलगीत अतिशय सुमधूर, रोमॅन्टिक.

साधारण याच दरम्यान रफी व लता यांच्यामध्ये गाण्यांच्या रॉयल्टीवरुन काहीतरी वाद झाला व तेव्हापासून काहीकाळ हे दोघे एकत्र गायले नाहीत. अशावेळी बड्या संगीतकारांनी बेस्ट सेकंड चॉईस म्हणून रफी बरोबर सुमनला युगल गीते दिली. शंकर जयकिशनने 'दिल एक मंदिर' चं शीर्षक गीत, 'तुझे प्यार करते हे करते रहेंगे' (एप्रिल फूल), अगर तेरी जलवा नुमाई न होती (बेटी बेटे), 'तुमने पुकारा और हम चले आए' (सांझ और सवेरा), 'तुझे देखा तुझे चाहा तुझे पूजा मैंने' (छोटीसी मुलाकात), 'आजकल तेरे मेरे प्यार के चर्चे हर जुबानपर' (ब्रह्मचारी), 'है ना बोलो बोलो' (अंदाज), 'दिलकी किताब कोरी है कोरी ही रहने दो'(यार मेरा) अनेक युगलगीत रफी, सुमनला दिली व अर्थातच सुमनची ही सर्वश्रेष्ठ लोकप्रिय युगलगाणी आहेत यात शंका नाही.

संगीतकार रोशनने 'दिलने फिर याद किया'च्या शीर्षक गीतात रफी, मुकेश यांच्या बरोबर सुमनला घेतले आणि हे यातील गाणं सर्वात जास्त लोकप्रिय ठरलं. ऋषीकपूरचा 'बदलते रिश्ते' लक्ष्मीकांत प्यारेलाल यांनी 'बदलते रिश्ते' चं शीर्षक गीत रफी, किशोर आणि सुमन यांना दिलं. या गाण्याने देखील बिनाका गाजवली. कल्याणजी आनंदजीच्या संगीताने बहरलेला 'जब जब फूल खिले'यातील 'ना ना करते प्यार तुम्हीसे कर बैठे' हे सुंदर गाणं अजूनही रसिकांना आठवत असेल. यांचं संगीत व हीच जोडी (शशीकपूर, नंदा) असलेला राजसाब फ्लॉप गेला. पण यातील 'तू जंगल की मोरनी मैं बागांदा मोर' हे पंजाबी ठेक्यातलं गाणं एकदम भन्नाट. 'फर्ज' मधील 'तुमसे ओ हसीना कभी मुहब्बत ना मैने करनी थी', 'जिगरी दोस्त' मधील 'रात सुहानी जाग रही है' अशी रफी, सुमनची कितीतरी युगलगीते खूप लोकप्रिय झाली, पण सुमन कल्याणपूरकडे नेहमी सेकंड चॉईस म्हणून पाहिलं ही मनाला खटकणारी गोष्ट!

- अनंत दसरे.



राशीभविष्य

- **मेष** : आजचा दिवस अडचणींचा राहील. कौटुंबिक मतभेद चिंता वाढवतील. नवे करार तुर्तास करू नयेत.
- **वृषभ** : नव्या योजना मार्गी लागतील. अनुभवातून बरंच काही शिकायला हवं. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **मिथुन** : मानसन्मान वाढीस लागेल. जुन्या स्मृतींना उजाळा मिळेल. मनाप्रमाणे सारं काही घडू शकेल.
- **कर्क** : व्यावसायिक बोलणी सफल होतील. दिलासादायक घटना घडतील. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राहील.
- **सिंह** : कामाची बरीच धावपळ राहील. स्थावर प्रश्न विचारानं सोडवावे. कलाकारांना उत्तम संधी लाभेल.
- **कन्या** : भावंडांशी मतभेद संभवतात. खर्च वाढला तरी प्राप्तीचं प्रमाणही वाढेल. प्रवास शक्यतो टाळावा.
- **तूळ** : धनलाभाचे योग आहेत. मित्र-नातलगांचं उत्तम सहकार्य लाभेल. पूर्वीची देणी पुन्हा रखडतील.
- **वृश्चिक** : अपेक्षित वार्ता कानी येईल. विवाहाची बोलणी सफल होतील. आध्यात्मिकतेकडे ओढा राहील.
- **धनु** : व्यवसायात अडचणी संभवतात. आर्थिक बाबतीत काटकसर ठेवावी. प्रकृतीच्या तक्रारी उद्भवतील.
- **मकर** : नोकरीत कामाचा ताण वाढेल. पित्ताचे विकार संभवतात. कौटुंबिक प्रश्नाबाबत विचारानं रहावं.
- **कुंभ** : यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. सरकारी कामं विलंबानं होतील. मुलांची चिंता राहील.
- **मीन** : मनातील विचार कृतीत येतील. नव्या आव्हानांवर मात कराल. ज्येष्ठांनी प्रकृतीकडे लक्ष द्यावं.

२६ नोव्हेंबर

दिनविशेष

१९८५ : कवी यशवंत दिनकर पेंढारकर अर्थात कवी यशवंत यांचे निधन.
१९९५ : चित्रमहर्षी म्हणून ओळखले जाणारे भालजी पेंढारकर यांचे निधन.
२००८ : मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात कर्तबगार पोलिस अधिकारी विजय साळसकर, हेमंत करकरे आणि अशोक कामटे शहीद.
२०१३ : कुडनकुलम अणुऊर्जा प्रकल्पापाजवळच्या गावात स्फोट, सहा ठार.
२०१५ : 'भारत माझा देश आहे, तो कधीच सोडणार नाही...' गोंधळानंतर आमीर खानचे स्पष्टीकरण.

असं का होतं?

तेल पाण्यावर का तरंगतं?

दोस्तांनो, तेल पाण्यावर तरंगत असल्याचं आपण नेहमी बघतो. समुद्रात तेलगळती झाल्यावर पाण्यावर तेलाचे तवंग दिसू लागतात. पाणी आणि तेल कधीही एकत्रित होत नाही. पावसाळ्यातही रस्त्यावर पेट्रोल सांडल्यावर पाण्यावर तवंग दिसतो. आता तेल पाण्यावर का तरंगतं, असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. वैज्ञानिक दृष्टिकोनातून बघितलं तर पाण्यापेक्षा वजनाने हलकी वस्तू त्यावर तरंगते. म्हणजेच त्या वस्तूची घनता पाण्याच्या घनतेपेक्षा कमी असते. त्याचप्रमाणे तेलाच्या कणांचं घनत्व पाण्याच्या रेणूंच्या घनतेपेक्षा कमी असतं. याच कारणामुळे तेल पाण्यावर तरंगतं. दुसरं म्हणजे तेल आणि पाणी हे दोन घटक कधीही एकमेकांमध्ये मिसळत नाहीत. तेल आणि पाणी एकत्र करून हलवलं तरी काही वेळानंतर तेल पुन्हा पाण्यावर तरंगताना दिसतं.

आरोग्यमंत्र

फळांचे असेही लाभ

फळं कधी खाल्ली पाहिजेत, हे एकदा समजून घेतलं की त्याच्या चांगल्या परिणामांची जाणीव आपल्याला होऊ लागते. संत्रं आणि लिंबासारखी काही फळं अम्लीय असतात. जर फळं खाण्याच्या योग्य पद्धतीवर प्रभुत्व मिळवलं असेल तर सौंदर्य, दीर्घायुष्य, आरोग्य, ऊर्जा, आनंद आणि योग्य वजन यांचं रहस्य समजतं. नेहमी फळांचा ताजा रस प्या. कॅन, पॅक किंवा बाटल्यांमधला फळांचा रस चांगला नसतो. गरम झालेला रसही पिऊ नका.



शिजवलेली फळं खाऊ नका, कारण त्यातून पोषक तत्त्वं मिळत नाहीत. आपल्याला फक्त त्याची चव कळते. रस पिण्यापेक्षा फळ खाणं केव्हाही चांगलं. ताज्या फळांचा रस प्यायचा असेल तर तो हळूहळू प्या. हा रस लाळेमध्ये मिसळून शरीरात गेल्यास अनेक लाभ होतात. शरीर स्वच्छ किंवा डिटॉक्सिफाय करण्यासाठी तीन दिवस केवळ फळांवर राहू शकता. तीन दिवस ताजी फळं खा आणि ताज्या फळांचा रस प्या. यामुळे तुमची त्वचा तजेलदार आणि चमकदार दिसू लागेल. डॉ स्टीफन माक टर्मिनल कर्करोगाच्या रुग्णांवर अन-ऑर्थोडॉक्स पद्धतीनं उपचार करतात त्यांचे बरेच रुग्ण बरे झाले आहेत. त्यांची उपचारपद्धती आजारांविरुद्ध शरीरातील नैसर्गिक उपचारांवर विश्वास ठेवते. कर्करोगाचे रुग्ण मरू नयेत, म्हणून त्यांना एक उपचार सापडला. कर्करोगाचा उपचार आधीच सापडला आहे. आपण ज्या प्रकारे फळं खातो त्यावर या उपचार पद्धतीचं यश अवलंबून आहे.

स्किन केअर

चेहरा उजळवणारे अननसाचे फेस पॅक

अननसाचे फेस पॅक तयार करता येतील. या फेस पॅकमुळे त्वचेच्या बऱ्याच समस्या दूर होतील.

❊ अननस आणि नारळाच्या दुधाचा पॅक चेहरा उजळवतो. तसंच यामुळे त्वचेवरील सुरकुत्या, काळे डाग दूर होतात. अननसाचे तीन-चार तुकडे घ्या. त्यात दोन चमचे नारळाचं दूध घाला. हे मिश्रण मिक्सरमध्ये वाटून घ्या. हा पॅक चेहरा आणि मानेवर लावा. अर्ध्या तासाने धुवून टाका. आठवड्यातून दोन वेळा हा फेस पॅक लावा. ❊ मृत त्वचा काढून चेहरा उजळवण्यासाठी दोन चमचे बेसनमध्ये अननसाचा गर घालून घट्ट पेस्ट तयार करा. ही पेस्ट काही वेळ चेहऱ्यावर लावून ठेवा. पंधरा मिनिटांनी धुवा. ❊ पिंपल्सची समस्या दूर करण्यासाठी अननसाच्या गरात ग्रीन टी आणि मध घालता येईल. हा पॅक चेहऱ्यावर लावून १५ मिनिटांनी धुवून टाका. ❊ अननसाच्या गरात थोडा पपईचा गर आणि मध मिसळा. हे मिश्रण चेहरा आणि मानेवर लावून २० मिनिटं ठेवा. थंड पाण्याने तोंड धुवा.❊ अननसाच्या गराने चेहऱ्याचा मसाज करा. थोड्या वेळाने धुवून टाका. अननसामुळे चेहऱ्याचा उजळपणा वाढल्याचं तुम्हाला जाणवेल.

वेगळ्या वाटा

या विषयात एमटेक करण्याचा पर्यायही तुमच्याकडे आहे. फोटोनिक्समध्ये विविध विषयांचा अभ्यास करता येईल. या क्षेत्रात प्रयोगशीलतेला महत्त्व आहे. फोटोनिक्समध्ये एमफिल तसंच पीएचडीही करता येईल.

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रात फोटोनिक्सचा उपयोग होतो. त्यामुळे हे क्षेत्र सातत्याने विस्तारत आहे. ऊर्जा, निर्मिती, आरोग्य अशा क्षेत्रांमध्ये तुम्ही संधी मिळवू शकता.या क्षेत्रात संशोधनालाही बराच वाव आहे. टेलिकम्युनिकेशनमध्ये फोटोनिक्सचा वापर होतो. तर असं हे क्षेत्र तरुणांना खुणावत आहे.

पंचांग

गुरूवार, २६ नोव्हेंबर २०२६
पराभवनाम संवत्सर शके १९४८, कार्तिक कृ. २, चंद्रराशी : वृषभ, नक्षत्र : मृगशीर्ष, योग : सिद्ध/साध्य, सूर्योदय ६.५४, सूर्यास्त ५.५७

फॉरवर्ड्स

लोगों क़ी मत सुना करों...

लोग़ तों कहतें हैं क़ि पूनम उजलीं हैं औऱ अमावस कालीं हैं...

फ़िर भी पूनम क़ो होली औऱ अमावस क़ो दिवाली हैं...!

करिअरवाटा

स्टेम सेल रिसर्चची नवी वाट

सध्याच्या आधुनिक युगात वैद्यकीय क्षेत्रात बरंच संशोधन होत आहे. त्यातून अनेक दुर्धर व्याधी बऱ्या करण्यासाठी स्टेम सेल उपचारपद्धती लाभदायक ठरत असल्याचं दिसून येत आहे. साहजिक येत्या काळात या क्षेत्राचा विस्तार होणार असून इच्छुकांना या क्षेत्रामध्ये उत्तम काम करता येण्यासारखं आहे. केवळ मेडिकल क्षेत्राशी संबंधित उमेदवार या क्षेत्रामध्ये कारकीर्द घडवू शकतात असा गैरसमज आहे. वस्तुत: सामान्य जीवशास्त्र शाखेतील विद्यार्थीही या शाखेत काम करू शकतात. काही वेगळं करू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी हे योग्य क्षेत्र आहे. बायोलॉजिकल सायन्समधला बीएसएसी ग्रॅज्युएट, एमबीबीएस, बीफार्म, बीई बायोटेक्नॉलॉजी पदवीधारक स्टेम सेल रिसर्चमध्ये काम करू शकतो. भारतात अनेक संस्था या थेरपीवर संशोधन करत आहेत. फॉर्मास्युटीकल आणि बायोटेक्नॉलॉजीमधील कंपन्या तसंच प्रमुख स्टेम सेल्स संस्था या थेरपीवर संशोधन करत आहेत. यामध्ये पदव्युत्तर शिक्षण घेणारे उमेदवार दरमहा उत्तम आर्थिक प्राप्ती करू शकतात. पीएच.डीनंतर या उत्पन्नात वरचेवर वाढ होत राहते. या संदर्भातील प्रशिक्षण देणाऱ्या संस्था बंगळूर, पुणे, मुंबई, हैदराबाद आदी ठिकाणी कार्यरत आहेत. या क्षेत्रातील उत्तम कारकीर्दीच्या संधीचा अवश्य विचार करावा..



खेचाखेची

युनिव्हर्सिटीज

भारतात ज्ञान वाटणाऱ्या महान टॉप ४ युनिव्हर्सिटीज...

१. व्हॉट्सॲप
२. पानटपरी
३. कटिंगचं दुकान
४. दारू प्यायलेला माणुस...
.
.
.

बाकी शाळा वगैरे सर्व अंधश्रद्धा आहे.

वेगळं काही

नासा ही अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था मंगळावर बरंच संशोधन करत आहे. याच दरम्यान नासाच्या शास्त्रज्ञांना मंगळ ग्रहावर एक शव असल्याचा शोध लागला. या शवाचे फोटो त्यांच्या हाती लागले. या शवाचे हात, पाय, डोकं सगळं काही शाबूत आहे. हे शव नेमकं कोणाचं आहे याबाबत प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. नासासह जगभरातले अंतराळ संशोधक या छायाचित्रांचा अभ्यास करण्यात गुंतले आहेत. या शवाच्या फोटोमुळे मंगळ ग्रहावर जीवसृष्टी असल्याच्या शक्यतांना पुष्टी मिळू शकते. या शवाच्या छायाचित्रामुळे अनेकांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. मंगळावर जीवसृष्टी असल्याचं सिद्ध झालं तर हा अखिल मानवजातीच्या दृष्टीने खूप मोठा शोध ठरू शकतो.

रूचिरा

आलू सोयाबीन कोफ्ता करी

एकाच पद्धतीच्या भाज्यांऐवजी सोयाबीन आलू कोफ्ता करी करून पाहा.



साहित्य : अर्धा कप सोया क्रंच, दोन उकडलेले बटाटे, चार टोमॅटो, एक इंच आलं, एक हिरवी मिरची, चिरलेली कोथिंबीर, तीन चमचा बेसन, अर्धा चमचा जिरं, एक चमचा कस्तुरी मेथी, पाव चमचा हळद, चमचाभर लाल तिखट, दीड चमचा धनेपूड, पाव चमचा गरम मसाला, मीठ, तेल, तमालपत्र, दालचिनी, ३ लवंग, ६-७ काळी मिरी, एक मोठी वेलची.

कृती : सोयाबीन क्रंचेस कुटून अर्धा कप गरम पाणी घालून भांडं झाका. दहा मिनिटांनी कुस्करलेले बटाटे, मीठ, धनेपूड, लाल तिखट, हिरवी मिरची, हळद, कोथिंबीर, बेसन घाला. मिश्रण एकजीव करा. तेल गरम करून मिश्रणाचे गोळे तळा. करीसाठी आलं, टोमॅटो, हिरवी मिरची मिक्सरमध्ये वाटून घ्या. तेल गरम करून जिरं, गरम मसाला घाला. हळद, धनेपूड परतून टोमॅटो, आलं-मिरची पेस्ट, कस्तुरी मेथी घाला. कढईतल्या मसाल्यात बेसन, दीड कप पाणी, गरम मसाला पावडर, कोथिंबीर घाला. ग्रेवी उकळू द्या. नंतर थोडं क्रीम, चवीनुसार मीठ घाला. झाकण ठेवून धीम्या आचेवर ग्रेवी शिजवा. शेवटी कोफ्ते ग्रेवीमध्ये मिसळा. गरम खायला द्या.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahilyanagar (Ahmednagar) (M Corp), Dist.Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahilyanagar (M Corp), Dist Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहिल्यानगर (अहमदनगर) (एम कॉर्प), जिल्हा-अहिल्यानगर (अहमदनगर), पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले.
संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

समाचार

बुधवार दि. २५ नोव्हेंबर २०२६ पान ३

अर्ज़ किया है...

अंधेरा माँगने आया था रौशनी की भीक
हम अपना घर न जलाते तो और क्या करते
- नज़ीर बनारसी

या शेरमध्ये त्याग, आदरातिथ्य आणि स्वार्थीपणावर मात करणारी उदारता अत्यंत प्रभावीपणे मांडली आहे.
आपल्याकडे काहीही शिल्लक नसतानाही समोरच्याची गरज भागवण्यासाठी स्वत:चं सर्वस्व पणाला लावण्याची वृत्ती यात दिसते. स्वत:चं घर जाळणं म्हणजे स्वत:चा निवारा, सुरक्षितता आणि अस्तित्व धोक्यात घालणं.

खोट्या तक्रारीच्या आधारे कर्मचाऱ्यांना मानसिक त्रासाचा आरोप
जिल्हा उपनिबंधकांच्या विरोधात कास्ट्राईब महासंघाची निदर्शने

समाचार/नगर-दि.२५

माहितीच्या अधिकाराखाली माहिती मिळवून सहकार विभागातील कर्मचाऱ्यांविरोधात कथित खोटे तक्रार अर्ज दाखल करणे आणि त्या अर्जांच्या आधारे कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास देण्यासाठी खातेनिहाय चौकशा लावण्याच्या प्रकाराचा महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब महासंघाच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. या निषेधार्थ शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मागील बाजूस असलेल्या जिल्हा उपनिबंधक कार्यालयासमोर ढोल-ताशांच्या गजरात जोरदार निदर्शने करण्यात आली. यावेळी संतप्त आंदोलकांनी खोट्या तक्रारी आणि चौकशीच्या प्रतींची होळी करून प्रशासनाच्या कार्यपद्धतीचा निषेध नोंदविला.

या आंदोलनात महासंघाचे राज्याध्यक्ष एन. एम. पवळे, वसंत थोरात, के. के. जाधव, सुहास धीवर, ना. म. साठे, भाऊसाहेब सिनारे, अश्विनी खरपुडे, ज्योती हराळे, सुरेश बनसोडे, डॅनियल पारधे, भारती रोहकले यांच्यासह सहकार विभागातील कर्मचारी सहभागी झाले होते.

कार्यालयातील कर्मचाऱ्यांना बाहेरील व्यक्तींकडून होणाऱ्या त्रासापासून संरक्षण देणे, त्यांना सुरक्षित वातावरणात काम करता यावे यासाठी आवश्यक



उपाययोजना करणे, हे संबंधित कार्यालयप्रमुखांचे प्राथमिक कर्तव्य आहे. मात्र, कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्याऐवजी जिल्हा उपनिबंधकांकडून त्यांच्याच विरोधात खातेनिहाय चौकशा लावल्या जात असल्याचा आरोप महासंघाने केला आहे. तसेच विविध तक्रार अर्जांच्या आधारे कर्मचाऱ्यांकडून लेखी खुलासे मागविणे, जबाब नोंदविणे आणि प्रशासकीय प्रक्रियांचा वापर करून त्यांना मानसिक त्रास दिला जात असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे.

या आंदोलनाच्या माध्यमातून महासंघाने प्रशासनासमोर विविध मागण्या मांडल्या. अहिल्यानगर जिल्ह्यातील सहकार विभागातील कर्मचाऱ्यांविरोधात नियमबाह्य पद्धतीने सुरू करण्यात आलेल्या खातेनिहाय चौकशा तातडीने रद्द कराव्यात, चुकीची माहिती देऊन अथवा तक्रार अर्जांच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना त्रास देण्याचे प्रकार त्वरित थांबवावेत, तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना पोलीस खात्यामार्फत आवश्यक संरक्षण मिळवून द्यावे, अशा मागण्या करण्यात आल्या.

सहाय्यक सहकारी अधिकारी डी. डी. पारधे आणि वरिष्ठ लिपिक ए. पी. खरपुडे यांनी २१ सप्टेंबर २०२६ रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याची योग्य पद्धतीने चौकशी करून संबंधित कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा, यासाठी आवश्यक कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. तसेच या प्रक्रियेत प्रशासनाने पूर्ण सहकार्य करावे, अशी मागणीही महासंघाने केली आहे.

पान १ वरुन

शहरास एक दिवस उशिराने होणार पाणीपुरवठा

पाणीपुरवठा केला जाणार आहे. सिद्धार्थनगर, लालटाकी, तोफखाना, दिल्लीगेट, नालेगाव, चितळेरोड, आनंदीबाजार, कापडबाजार, खिस्तगल्ली, पंचपीर चावडी, जुने महापालिका कार्यालय परिसर, माळीवाडा, बालिकाश्रम रोड परिसर, सावेडी या भागास रविवारऐवजी सोमवारी पाणीपुरवठा होणार आहे.

७९ हजारांचा मुद्देमाल जप्त अवैध गुटखा विक्रेत्यावर छापा

८७६ रुपये किमतीचा विमल व रजनीगंधा पानमसाला आणि सुगंधी तंबाखू, तसेच ५० हजार रुपये किमतीची सुझुकी कंपनीची मोपेड असा एकूण ७९ हजार ८७६ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

कंटेनर अडवून चालकाला लुटणारी टोळी गजाआड

कसून चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली देत साथीदाराचे नाव सांगितले. त्यानुसार पोलिसांनी त्याचा साथीदार आदेश दिलीप गट (वय २६, रा. वडुले, ता. पारनेर) यालाही ताब्यात घेतले. पोलिसांनी आरोपींकडून ६ लाख रुपये किमतीची हुंदाई आय-२० कार आणि ६० हजार रुपये किमतीचे ३ मोबाईल असा एकूण ६ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

मनपाकडून अतिक्रमणांवर हातोडा

प्रशासनाने आज अतिक्रमण हटाव मोहीम राबवली. महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाचे प्रमुख आदित्य बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली. पथकाने रस्त्यावरील अनधिकृत शेड, हातगाड्या, फलक आणि साहित्य जप्त केले. या कारवाईमुळे संबंधित परिसरातील रस्ते व पदपथांनी मोकळा श्वास घेतला आहे. या कारवाईत अतिक्रमण विभागाचे अधिकारी, कर्मचारी सहभागी होते तसेच पोलीस बंदोबस्त तैनात होता.

नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांची गुरुवारी शहरात तातडीची बैठक

समाचार/नगर-दि.२५

नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी व पुढील दिशा ठरवण्यासाठी गुरुवार दि.२६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता महाजन गल्लीतील गायत्री मंदिरात तातडीची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत ॲड.अच्युतराव पिंपळे हे ठेवीदारांना महत्वाची माहिती देणार आहेत. तसेच नगर अर्बन बँक बचाव संघर्ष समितीचे अध्यक्ष राजेंद्र गांधी मार्गदर्शन करणार आहेत. समितीने आतापर्यंत केलेली कामे आणि आगामी काळातील नियोजनाची माहिती यावेळी देण्यात येइल. त्यामुळे नगर शहर, तालुका, जिल्हा आणि जिल्ह्याबाहेरील सर्व ठेवीदारांनी या बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन डी.एम.कुलकर्णी यांनी केले आहे.

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे उद्या कामबंद आंदोलन

समाचार/नगर-दि.२५

राज्यातील विद्यापीठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या न्याय्य मागण्यांबाबत शासनाकडून अद्याप कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही. विविध मागण्यांवर शासनाकडून वारंवार आश्वाससने दिली जात असली, तरी प्रत्यक्ष शासन निर्णय निर्गमित होत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. शासनाच्या या उदासीन भूमिकेच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकेतर सेवक संयुक्त कृती समितीने आता आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी राज्यव्यापी कामबंद आंदोलन करण्यात येणार असून, या आंदोलनात अहिल्यानगर जिल्ह्यातील शिक्षकेतर कर्मचारीही सहभागी होणार आहेत. त्यानंतरही शासनाने मागण्यांची दखल न घेतल्यास बेमुदत संपाचा पुकारण्यात येईल, असा स्पष्ट इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष वैभव रोडी, उपाध्यक्ष बाळासाहेब इघे आणि सचिव संतोष कानडे यांनी दिली.

विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील शिक्षकेतर कर्मचारी शैक्षणिक व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहेत. विद्यार्थ्यांचे प्रवेश, परीक्षा, निकाल, प्रशासकीय कामकाज, ग्रंथालये आणि प्रयोगशाळांचे कामकाज सुरळीत ठेवण्यात या कर्मचाऱ्यांची महत्त्वपूर्ण भूमिका असते. मात्र, या कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्नच वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही शासनाकडून ठोस निर्णय होत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे.शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये सातव्या वेतन आयोगानुसार १०, २० व ३० वर्षांच्या सेवेनंतर अनुज्ञेय असलेली सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना तातडीने लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच सन २००५ पूर्वी भरती प्रक्रिया सुरू अथवा पूर्ण झालेल्या आणि त्यानंतर सेवेत रुजू झालेल्या अनुदानित कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

किल्ला बनवा स्पर्धेत बागडपट्टी विघ्नहर्ता प्रतिष्ठान द्वितीय



समाचार/नगर-दि.२५

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, अहिल्यानगर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या किल्ला बनवा स्पर्धा २०२६' चा निकाल जाहीर झाला. यामध्ये अहिल्यानगर मध्यवर्ती भागातील बागडपट्टी येथील बागडपट्टीचा विघ्नहर्ता प्रतिष्ठान, बागडपट्टी, अहिल्यानगर या मंडळाच्या बाल सभासदांनी बांधलेल्या १८ बाय १२ फूट आकाराच्या भव्य मातीच्या सिंहगड किल्ल्याला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. निकाल जाहीर होताच शहराचे उपमहापौर धनंजय जाधव यांनी फोन करून सर्व बाल सभासदांचे कौतुक करून अभिनंदन केले. त्यानंतर बाल सभासदांनी जल्लोषात मिरवणूक काढून किल्ल्याभोवती १०१ दिवे लावून त्रिपुरारी पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी केली. सदर किल्ल्याचे अनावरण १४ नोव्हेंबर, जागतिक बाल दिना निमित्त उपमहापौर धनंजय जाधव व सर्व बाल सभासद यांच्या हस्ते करण्यात आले होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे विशेष म्हणजे, या सर्व कार्यक्रमाचे नियोजन सर्व बाल सभासदांनीच केले होते. उपमहापौर जाधव म्हणाले, दिवाळीमध्ये किल्ला तयार करणे हा उपक्रम सर्व लहान मुलांना मोबाईलच्या विश्वातून बाहेर काढून आपल्या धर्माची, संस्कृतीची आणि इतिहासाची जवळून ओळख करून देण्याचा उत्तम प्रयत्न आहे. लहान मुले ही भारताचे भविष्य आहेत, त्यांना संस्कृतीची जोपासना देणे ही काळाची गरज आहे. आज बागडपट्टी येथे ज्या प्रकारे बाल गोपालांनी किल्ला बनविला आहे, तो येत्या काळात नगरकरांसाठी प्रेरणा देणारा असा ठरेल.

कालव्यात पडलेल्या तरुणाचा मृतदेह सापडला

समाचार/श्रीगोंदा-दि.२५

फरशी बसवण्याच्या कामासाठी बिहारमधून महाराष्ट्रात आलेल्या एका परप्रांतीय तरुणाचा कुकडी डावा कालव्यात पडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. मो. एहसानुल्लाह (वय १९) असे या मृत तरुणाचे नाव आहे.

रविवारी (दि. २२) सकाळी तांदळी दुमाला येथील कालव्यात पडलेल्या या तरुणाचा मृतदेह आज मंगळवारी (दि. २४) कर्जत तालुक्यातील चांदे येथे पाण्यावर तरंगताना आढळून आला. मिळालेल्या माहितीनुसार, बिहारचा रहिवासी असलेला मो. एहसानुल्लाह हा तरुण फरशी बसवण्याच्या कामासाठी महाराष्ट्रात आला होता. तो रोजंदारीवर ठेकेदाराकडे काम करत होता. रविवारी सकाळी ९ ते १० वाजण्याच्या सुमारास तांदळी दुमाला (ता. श्रीगोंदा) गावातील कुकडी डावा कालव्याच्या कॅनॉल गेट क्रमांक २५६/३२० येथे तो पाण्यात पडला. घटनेची माहिती मिळताच श्रीगोंदा तहसील कार्यालयातील अधिकारी यांच्या उपस्थितीत नगरपालिकेच्या आपत्कालीन विभागाच्या पथकाने कालव्यात त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला; परंतु काल त्याचा शोध लागू शकला नाही. अखेर आज मंगळवारी (दि. २४) कर्जत तालुक्यातील चांदे गावच्या हद्दीत कालव्याच्या पाण्यावर त्याचा मृतदेह तरंगताना आढळून आला.

भावना ऋषी सोसायटीत हरिनाम सप्ताहाची सांगता



समाचार/नगर-दि.२५

कल्याण रोड येथील भावना ऋषी सोसायटी, छत्रपती शिवाजीनगर येथे श्री विठ्ठल रुक्मिणी प्रतिष्ठान ट्रस्टच्या वतीने आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता झाली. सप्ताहाच्या अंतिम दिवशी ह.भ.प. गायनाचार्य योगेश्वर महाराज जाधव शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने उपस्थित भाविकांना भक्तिरसाचा अनुभव मिळाला. काल्याच्या कीर्तन प्रसंगी दहीहंडी फोडून परंपरेनुसार सप्ताहाची सांगता करण्यात आली.

सप्ताहाच्या कालावधीत दररोज पहाटे काकडा, सायंकाळी हरिपाठ आणि रात्री कीर्तन अशा धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विविध नामवंत कीर्तनकारांनी संतांच्या विचारांचा, भक्तीचा, सदाचाराचा आणि जीवनमूल्यांचा संदेश आपल्या कीर्तनातून दिला. परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून हरिनाम, भजन आणि कीर्तन श्रवणाचा लाभ घेतला. संपूर्ण सप्ताहात परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

नगरसेवक श्याम नळकांडे यांनी मनोगत व्यक्त केले. काल्याच्या कीर्तनातून ह.भ.प. गायनाचार्य योगेश्वर महाराज जाधव शास्त्री यांनी भगवान श्रीकृष्णाच्या बाललीला, गोप-गोपिकांच्या भक्तीभावाचा आणि संतांनी सांगितलेल्या नामस्मरणाच्या महत्त्वाचा भावपूर्ण उलगडा केला.

कृती समितीचे मनपा आयुक्तांना निवेदन
फुले पुण्यतिथीनिमित्त सुविधा पुरवाव्यात

समाचार/नगर-दि.२५

थोर समाजसुधारक, सत्यशोधक विचारांचे प्रणेते महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त शनिवार, दि. २८ नोव्हेंबर २०२६ रोजी माळीवाडा वेस येथील महात्मा फुले यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी महानगरपालिकेने आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी क्रांतीज्योती सावित्रीबाई-महात्मा ज्योतिराव फुले कृती समितीच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात समितीचे अध्यक्ष प्रा. माणिक विधाते, पंडित खरपुडे आणि ऋषिकेश चव्हाण यांनी महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले.

महात्मा ज्योतिबा फुले यांची २८ नोव्हेंबर रोजी पुण्यतिथी असून, या दिवशी शहरातील विविध सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रांतील मान्यवर, कार्यकर्ते तसेच नागरिक माळीवाडा वेशीवरील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करतात. त्यामुळे या ठिकाणी नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती असते. या पार्श्वभूमीवर महापालिकेने पुतळा परिसराची स्वच्छता करून तेथे मंडप उभारावा, तसेच अभिवादन कार्यक्रमासाठी माईक व ध्वनिक्षेपकाची व्यवस्था करावी, अशी मागणी समितीने निवेदनातून केली आहे.

श्री साईबाबा वर्धापनदिन सप्ताहाची सांगता
धार्मिक उत्सव सामाजिक एकोपा वाढविणारे माध्यम - कवडे

समाचार/नगर-दि.२५

नालेगाव येथील वाघगल्ली परिसरातील श्री साईबाबा मंदिराच्या २४ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित धार्मिक सप्ताहाची सांगता काल्याच्या कीर्तनाने भक्तिमय वातावरणात झाली. सप्ताहानिमित्त आयोजित पालखी मिरवणूक, भजन, कीर्तन व विविध धार्मिक कार्यक्रमांना भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ह.भ.प. जंगले महाराज शास्त्री यांच्या कीर्तनातून भक्ती, श्रद्धा, माणुसकी आणि संतविचारांचा संदेश उपस्थित भाविकांना मिळाला.वर्धापन दिन सप्ताहानिमित्त श्री साईबाबांची पालखी मिरवणूक



मोठ्या उत्साहात काढण्यात आली होती. साईनामाचा जयघोष, भक्तिमय वातावरण आणि भाविकांचा सहभाग यामुळे परिसरात धार्मिक उत्साह निर्माण झाला. मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त चार दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भजन, कीर्तन आणि आध्यात्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून भाविकांना संतांच्या विचारांचा व भक्तीचा अनुभव घेता आला.

आयोजक तथा नगरसेवक गणेश कवडे यांनी मनोगत व्यक्त करताना, धार्मिक उत्सव हे समाजाला एकत्र आणणारे आणि सामाजिक एकोपा वाढविणारे महत्त्वाचे माध्यम असल्याचे सांगितले. साईबाबांनी दिलेला श्रद्धा आणि सबुरीचा संदेश प्रत्येकाने आपल्या जीवनात अंगीकारणे आवश्यक आहे.

मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित सप्ताहामागे केवळ धार्मिक परंपरा जपणे एवढाच उद्देश नसून परिसरातील नागरिक, युवक आणि भाविकांना एकत्र आणून सामाजिक सलोखा व बंधुभाव वाढविण्याचा प्रयत्न असल्याचे कवडे यांनी सांगितले.

काल्याच्या कीर्तनात ह.भ.प. जंगले महाराज शास्त्री यांनी संत परंपरेचे महत्त्व सांगताना, संतांचे विचार हे समाजाला योग्य दिशा देणारे असून माणसाने आपल्या आचरणातून भक्ती प्रकट करावी, असे मार्गदर्शन केले. या काल्याच्या कीर्तन सोहळ्यास माजी महापौर भगवानराव फुलसुंदर, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, किशोर डागवाले, आशा डागवाले, संतोष गेनबा, उदय कराळे, धानोरा पंचायत समिती सदस्य परमेश्वर शेळके यांच्यासह आयोजक, मान्यवर आणि परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विजयसिंह परदेशी यांचे निधन

समाचार/नगर-दि.२५

येथील विजयसिंह किसनसिंग परदेशी यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८२ वर्षांचे होते. त्यांनी वेगवेळ्या संस्थांवर पदाधिकारी म्हणून काम पाहिले.



नगर तालुका दूध संघाचे ते चेअरमन होते तसेच ग्राहक भांडारचे संचालक होते. शिवसेना वैद्यकीय कक्ष राज्य कार्यकारीणी सदस्य रणजिसिंह परदेशी यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले रणजित परदेशी व प्रताप परदेशी, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

मुंबई शेअर भाव

रुपयात लक्षणीय वाढ ९२.२८ कच्च्या तेलात घट (वायदा ८७.१६) सेन्सेक्स-१२०० तर निफ्टी ४०० ने वाढ

अशोक पटवा हजार
(शेअर सबब्रोकर)
फोन-२४५२५२७, २४५२२६४
मोबा. ८७८८६९९९६१
दिनांक २५-११-२०२६
दुपारी २ पर्यंतचे भाव

आजचा इंडेक्स :	८३५५५
एसीसी	१२५८-५९
एशियन पेंट	२६०१-०२
बजाज ऑटो लि.	१०७२०-२१
बलराम फूड चिनी	६१७-१८
भारत फोर्ज	१७२४-२५
क्रॉम्प्टन	२१९-२०
डीएलएफ	७९४-९५
डॉ. रेड्डीज् लॅब	१४०१-०२
ग्रॅफाईट इंडिया	७९५-९६
हिंदुस्थान युनिलिव्हर	२०९५-९६
आयटीसी लि.	३०८-०९
एल ॲण्ड टी लि.	४१३४-३५
रिलायन्स इंड.	१३६७-६८
एसबीआय	११३३-३४
टाटा मोटर्स	२५९-६०
टाटा स्टील	१५९-६०
टीसीएस	२४९६-९७
लक्ष्मी ऑरगॅनिक	१५३-५४
कोव्हान्स फार्मा	४८८-८९

कार्तिक स्वामी जन्मोत्सव उत्साहात

समाचार/नगर-दि.२५

स्टेट बँक रोडवरील जीपीओ कार्यालयासमोरील श्री विजय शंकर महादेव मंदिरात कार्तिक स्वामी जन्मोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

वर्षातून केवळ एकदाच कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी कार्तिक स्वामींचे दर्शन होत असल्याने पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांनी मंदिरात मोठी गर्दी केली होती. यानिमित्त कार्तिक स्वामी महाराजांना महाअभिषेक व जलाभिषेक करण्यात आला. पहाटे पुजारी राजेंद्र राजमाने यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली.



यावेळी मंदिरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.दिवसभर भाविकांनी कार्तिक स्वामींचे दर्शन घेतले.माधुरी साखला यांनी कार्तिक स्वामींची आकर्षक रांगोळी रेखाटली होती. सायंकाळी त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त मंदिरात भव्य दीपोत्सव साजरा करण्यात आला. एक हजार एक दिव्यांच्या पणत्या प्रज्वलित करण्यात आल्याने मंदिर परिसर दिव्यांच्या लखलखाटाने उजळून निघाला. यानंतर कार्तिक स्वामींची महाआरती करण्यात आली. महाआरतीनंतर तुलसी विवाह सोहळाही उत्साहात पार पडला.

या धार्मिक सोहळ्याप्रसंगी पुजारी राजेंद्र राजमाने, ॲड. महेश तवले, संजय सावंत, रामदास नवसुपे, अनिल कचकल, अजय नामदे, घुपधरे, विष्णू पवार, जीवाप्पा संभाजी आहेर, नंदू चोथे, संजय बहिरवाडे, महादू काटकर,वनाजी गोडळकर,माधुरी साखला, संगीता राजमाने आदींसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नगरला शुक्रवारी ग्रंथ प्रकाशन सोहळा

समाचार/नगर-दि.२५

अहिल्यानगरचे ज्येष्ठ विधीतज्ञ अँड.डी.डी.घोरपडे यांनी भारतीय संस्कृतीचा इतिहास अत्यंत सोप्या भाषेत लिहून यामध्ये ४ वेद, ११उपनिषदे, रामायण, महाभारत, ६ शास्त्र व १८ पुराणे, सर्व संप्रदाय तसेच पंथ भागवत धर्मातील संतांची संक्षिप्त माहिती यामध्ये दिलेली आहे. स्व. मंगलाताई घोरपडे यांच्या प्रथम पुण्यस्मरणाचे औचित्य साधून शुक्रवार दि. २७ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वा.नगर – छत्रपती संभाजी नगर – रोडवरील चेतना लॉन येथे ग्रंथ प्रकाशन सोहळा पार पडणार आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, पुणे येथील ८९ वे अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते या ग्रंथाचे प्रकाशन होत आहे. यावेळी जेष्ठ संत साहित्य अभ्यासक प्राचार्य डॉ.शिरीष लांडगे, संत साहित्याचे गाढे अभ्यासक व विचारवंत सद्गुरु साहेबराव आवारे, खा. निलेश लंके, आ.संग्राम जगताप, श्रीगोंद्याचे आ.विक्रम पाचपुते, श्रीरामपूरचे आ.हेमंत ओगले, महापौर ज्योती गाडे तसेच नगरसेवक, लेखक, साहित्यिक, अभ्यासक, उपस्थित राहणार आहेत.

राज्यस्तरीय कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी दत्तात्रय वारकड

समाचार/नगर-दि.२५

अहिल्यानगर जिल्ह्याचे सुपुत्र, कवी, लेखक व प्रेरणादायी वक्ते दत्तात्रय वारकड यांची अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद, पुणे जिल्हा पूर्व विभागाच्या १० व्या राज्यस्तरीय कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे.



अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद,पुणे जिल्हा पूर्व विभाग व एमआयटी विद्यापीठ, लोणी काळभोर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य राज्यस्तरीय कवी संमेलन रविवार, दि. २९ नोव्हेंबर रोजी एमआयटी विद्यापीठातील 'प्रयाग सभागृह' येथे संपन्न होणार आहे.

संत साहित्याचे अभ्यासक म्हणून अहिल्यानगर जिल्ह्यात कार्यरत असलेले वारकड यांनी कविता, लेखन आणि प्रेरणादायी व्याख्यानाच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्रभर नावलौकिक कमावला आहे. आजपर्यंत त्यांनी १००० हून अधिक प्रेरणादायी व्याख्याने दिली आहेत.

तणावमुक्त जीवन,आनंदी जीवनाचा आनंदोत्सव, व्यक्तिमत्व विकास, व्यसनमुक्ती,आजचा युवक व त्याच्यापुढील आव्हाने, मातृ-पितृ व गुरुजनांविषयी आदर,वाचन संस्कृती, मोबाईलचा अतिरिक्त वापर टाळणे या ज्वलंत विषयांवर ते शाळा,कॉलेज,तांत्रिक महाविद्यालये,पोलीस प्रशासन,जिल्हा परिषद, शासकीय कार्यालये, एमआयडीसी कंपन्या, आकाशवाणी अशा विविध ठिकाणी प्रबोधन करत आहेत.

राज्य सहकारी बँकेला 'एक्सलन्स इन सायबर सिक्युरिटी' पुरस्कार

समाचार/नगर-दि.२५

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने सहकारी बँकिंग क्षेत्रात उत्कृष्ट कार्य, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि सायबर सुरक्षेच्या क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर आणखी एक मानाचा पुरस्कार प्राप्त केला आहे. नवी दिल्ली येथे आयोजित एक्सलन्स अवॉर्ड्स २०२६' सोहळ्यात बँकेला एक्सलन्स इन सायबर सिक्युरिटी' पुरस्काराने गौरविण्यात आले. देशातील सर्वोत्कृष्ट राज्य सहकारी बँक म्हणून मिळालेल्या बहुमानाबरोबरच सायबर सुरक्षेच्या क्षेत्रातील हा सन्मान बँकेच्या तांत्रिक क्षमतेची, दूरदृष्टीची आणि सहकार क्षेत्राप्रती असलेल्या बांधिलकीची राष्ट्रीय स्तरावर दखल घेणारा ठरला आहे.



नवी दिल्लीतील चाणक्यपुरी येथील हॉटेल अशोकामध्ये आयोजित पुरस्कार सोहळ्यात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी फिनान्शियल सर्व्हिसेस इन्स्टिट्यूशन्स ब्युरोचे सदस्य सतीश मराठे, नॅफस्कॉबचे अध्यक्ष लक्ष्मीदास, इंडियन को-ऑपरेटिव्हचे अजय झा यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

नाबार्डचे वरिष्ठ मुख्य महाव्यवस्थापक मणीकुमार सिवरामकृष्णन यांनी देश-विदेशातील अशा प्रकारच्या केंद्रांचा संदर्भ घेत राज्य सहकारी बँकेने वाशी येथे उभारलेले सायबर सिक्युरिटी ऑपरेशन सेंटर अत्यंत आधुनिक आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम असल्याचे गौरवोद्गार काढले आहेत.

उत्कृष्टता आणि सायबर सुरक्षेतील तांत्रिक नेतृत्व या दोन्ही क्षेत्रांमध्ये बँकेने मिळविलेला हा पुरस्कार राज्याच्या सहकारी बँकिंग व्यवस्थेसाठी अभिमानाची बाब आहे.

या सायबर सुरक्षा सेवांचा लाभ राज्यातील काही जिल्हा बँका आणि नागरी सहकारी बँकांनी घेण्यास सुरुवात केली आहे. उर्वरित सहकारी बँकांनीही या आधुनिक सुरक्षा व्यवस्थेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी यापूर्वी केले आहे. सहकारी बँकिंग क्षेत्राला डिजिटल युगातील आव्हानांचा सामना करण्यासाठी सक्षम बनविणे, आर्थिक व्यवहारांची सुरक्षितता वाढविणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सहकार क्षेत्राची विश्वासार्हता अधिक दृढ करणे, या उद्दिष्टांच्या दिशेने महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे हे पाऊल महत्त्वपूर्ण मानले जात आहे. वाशी येथील सायबर सिक्युरिटी ऑपरेशन सेंटर आणि त्याला मिळालेला राष्ट्रीय पुरस्कार राज्यातील सहकारी बँकांसाठी सुरक्षित डिजिटल बँकिंगच्या नव्या पर्वाची दिशा अधोरेखित करणारा आहे.

सेंट्रल बँकेचा कृषी कर्ज मेळावा २७ रोजी

समाचार/नगर-दि.२५

शेतकऱ्यांच्या शेतीपूरक उद्योग व्यवसायांना बळ बळ देऊन शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती सुधारावी उद्देशाने सेंट्रल बँक ऑफ इंडिया अहिल्यानगर च्या वतीने येत्या २७ नोव्हेंबर रोजी घारगाव या. श्रीगोंदा येथे राष्ट्रव्यापी कृषी कर्ज आऊटरीच कॅम्प आयोजित करण्यात आला आहे. कृषी क्षेत्राला वेळेत कर्जपुरवठा, गरजेनुसार आर्थिक उपाययोजना आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू असल्याचे सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रबंधक नरेश कुमार दुबे यांनी सांगितले.

या शिबिरामध्ये शेती, कृषी प्रक्रिया उद्योग, वाहन खरेदी, शेती अवजारे तसेच बचत गटांतील महिला उद्योजकांसाठी विविध आकर्षक कर्ज योजनेचा लाभ मिळणार आहे. नारी शक्ती या स्कीमच्या माध्यमातून स्वयंसाहाय्यता गटातील महिला सदस्यांना उद्योजिका म्हणून पुढे येण्यासाठी आकर्षक व्याजदरात कमाल ५ लाख रुपयांपर्यंत आर्थिक मदत मिळणार असून, सर्व कर्ज योजनांसाठी बँकेचे नियम व अटी लागू राहणार असून, अधिक माहितीसाठी **www.centralbank.bank.in** या संकेतस्थळाला भेट देण्याचे अथवा जवळच्या शाखेशी संपर्क साधण्याचे आवाहन बँकेतर्फे करण्यात आले आहे.

हॅलो डॉक्टर

आयुर्वेद आणि पंचकर्म चिकित्सा



आपला भारत देश हा एक प्राचीन देश आहे आपली प्राचीन पारंपरिक संस्कृती जशी आहे. कारण आपल्या देशातील ऋषीमुनींनी हजारो वर्षा पूर्वी वृक्ष, जडीबुटी, फळ, फुल अशा रानावनातील नैर्सगिक पाल्यापासून आणि फळांपासून प्रभावी अशी उपचार पद्धती विकसित केली. याच आयुर्वेदाने शारीरिक आणि मानसिक विकारांवर उत्तम अशी रामबाण उपचार पद्धती शोधून काढली ज्या उपचार पद्धतीला आज जगाने स्वीकारलेले आहे. कोणत्याही प्रकारच्या आजाराचा केवळ इलाज करण्यापेक्षा त्या आजाराचे शरीरातून समूळ उच्चाटन करणे म्हणजेच आयुर्वेदिक उपचार पद्धती. याच आयुर्वेदिक उपचार पद्धतीचा महत्वाचा भाग म्हणजे पंचकर्म चिकित्सा अनेक प्रकारच्या शारीरिक व्याधींवर अशा प्रकारची पंचकर्म चिकित्सा ही एक प्रभावशाली उपचार पद्धती मानली गेली आहे . ही पंचकर्म उपचार पद्धती म्हणजे नेमकी कोणती उपचार पद्धती ?याच विषयाच्या अनुषंगाने गुजरातच्या नेत्रचिकित्सा आयुर्वेदिक महाविद्यालयात कार्यरत असलेले वैद्य चेतन गुल्हाने यांच्याशी केलेली बातचीत.

पंचकर्म म्हणजे काय? आणि आयुर्वेदामध्ये पंचकर्माला किती महत्व आहे?

आयुर्वेद ही भारताची एक प्राचीन पारंपरिक उपचार पद्धती आहे. आयुर्वेदाचे सिद्धांत हे आजच्या आधुनिक काळात देखील तितकेच उपयुक्त ठरतात. रुग्णाला बरे करण्यासाठी खनिज स्वरूपात औषधांचा उपचार केला जातो त्याला शमन चिकीत्सा म्हणतात. आपल्या शरीरात जे दोष असतात त्याचे मुळापासून उच्चाटन करणे आणि ते शरीराच्या बाहेर काढणे याला शोधन चिकित्सा पद्धती म्हणतात. एखादी व्याधी पुन्हा उद्भवू नये म्हणून जे उपचार केले जातात ते म्हणजे आयुर्वेद उपचार त्यालाच पंचकर्म म्हणतात. पंचकर्मामध्ये ५ कर्म असतात. विरेचन, बस्ती, रक्त मोशन, वमन आणि नत्स्य चिकित्सा असे पाच प्रकार आहेत.

पंचकर्म चिकित्सा ही उपचार पद्धती कुणी करावी आणि कुणी करू नये असा काही नियम आहे का?

एखादी व्यक्ती निरोगी असेल किंवा कुणी एखाद्या दुर्धर आजाराने पीडित असेल अशी कुणीही व्यक्ती पंचकर्म चिकित्सा करू शकते. बहुदोष म्हणजेच आपल्या शरीरात जे टॉक्सिन असते ते प्रमाणापेक्षा जास्त वाढते तेव्हा बहुदोष उत्पन्न होतो आणि तो जेव्हा अनेक ॲलोपॅथिक औषधांनी नियंत्रणात येत नाही तेव्हा त्याला पंचकर्म चिकित्सा उपयुक्त ठरते. मधुमेह उच्च रक्तदाब,किडनीचे विकार, केस गळणे, निद्रानाश अशा दुर्धर आजारांमध्ये पंचकर्म चिकित्सा खूपच उपयुक्त ठरते.

पंचकर्मातील महत्वाच्या वमन ,विरेचन आणि बस्ती या उपचार पद्धती बद्दल थोडक्यात काय सांगाल?

पंचकर्मातील एक महत्वाचे कर्म म्हणजेच वमन यामध्ये थिरयोटिक ओमेटिंग अर्थात उलट्या करून शरीरातील दोष बाहेर टाकले जातात. मदनकट, सैंधव आणि मधाच्या गोळ्या खायला देऊन शरीरातील दोष बाहेर काढले जातात. याला १ ते १२ तासांचा कालावधी तर कधी १० दिवस देखील लागतात. विरेचन या कर्मात विविध औषधी देऊन शरीरातील दोष पक्वाशयात आणले जातात आणि गुदद्वाराद्वारे बाहेर काढले जातात. पिंपळ, त्रिफळा अशा गोळ्यांचा यामध्ये औषध म्हणून वापर करतात. पित्ताशयाच्या विकारावर हे कर्म उपयोगी आहे. बस्ती या कर्म प्रकारात मेडिकेअर ऑईल किंवा औषध गुदद्वाराद्वारे देतात आयुर्वेदातील ही एक उत्तम उपचार पद्धती आहे .स्पायनल कॉर्ड ,पक्षाघाताचा आजारावर बस्ती उपचार पद्धती एक रामबाण इलाज आहे

पंचकर्म उपचार पद्धतीचे फायदे काय आहेत ?

पंचकर्म उपचार पद्धतीचा मुख्य फायदा म्हणजे शारीरिक आणि मानसिक बळ प्राप्त होते. आपला त्वचेचा रंग उजळतो. आपली श्रवनशक्ती, ध्यान, दृष्टी वाढते आणि आपल्या शरीरात जे सात धातू आहेत. ते उत्तम पद्धतीने तयार होतात शरीरामध्ये सूक्ष्म चॅनेल्स तयार होतात ज्यामुळे शरीर प्रक्रिया सुरळीत चालते असे पंचकर्माचे अनेक फायदे आहेत.



स्पिरोमीटर

ओळख वैद्यक उपकरणाची

स्पिरोमीटर हे फुफ्फुसांची कार्यक्षमता आणि श्वासोच्छ्वासाचा वेग मोजणारे वैद्यकीय उपकरण आहे. याचा वापर दमा, **COPD** सारख्या आजारांचे निदान करण्यासाठी किंवा शस्त्रक्रियेनंतर फुफ्फुसे मजबूत करण्यासाठी केला जातो. डायग्नोस्टिक स्पिरोमीटर **(Diagnostic Spirometer)**: रुग्णालये किंवा क्लिनिकमध्ये श्वासाची चाचणी घेण्यासाठी वापरले जाते. यात पूर्ण श्वास बाहेर सोडण्याचे प्रमाण आणि एका सेकंदात बाहेर सोडलेली हवा मोजली जाते. इन्सेंटिव्ह स्पिरोमीटर घरी किंवा शस्त्रक्रियेनंतर फुफ्फुसांचा व्यायाम करण्यासाठी वापरले जाणारे उपकरण. यामध्ये साधारणपणे ३ चेंडू असतात, जे खोल श्वास घेतल्यावर वर उचलले जातात. चाचणीपूर्वी किमान ३० मिनिटे व्यायाम टाळावा आणि धूम्रपान किंवा मद्यपान करू नये.चाचणीपूर्वी सुमारे २ तास खाणे-पिणे टाळणे चांगले असते. चुकीच्या वापरामुळे चक्कर येणे किंवा धाप लागणे असे होऊ शकते, त्यामुळे डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखालीच याचा वापर करावा.

मेट्रोपॉलिस हेल्थकेअरचे प्रगत निदान चाचणी केंद्राचे उद्घाटन

जनआरोग्य



भारतातील अग्रगण्य निदान सेवा कंपनी असलेल्या मेट्रोपॉलिस हेल्थकेअर लिमिटेडचे पहिले नवीन मेट्रोपॉलिस लॅब शॉप क्रमांक १९ आणि २०, तळमजला, सिव्हिल क्लब, मंठा रोड, येथे असून त्याचे उदघाटन मेट्रोपॉलिस हेल्थकेअरचे बिझनेस हेड डॉ. राहुल कावनकर यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी आदी मान्यवर उपस्थित होते. मेट्रोपॉलिस हेल्थकेअरचे हे नवीन निदान केंद्र ७०० चौरस फूट क्षेत्रफळात पसरलेले असून येथे वेगवान कामकाज आणि उच्च दर्जाचे अहवाल यांसह दर महिन्याला सुमारे ५००० नमुने घेण्याची क्षमता आहे.

मेट्रोपॉलिस हेल्थकेअर लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेंद्रन चेम्मेनकोट्टिल म्हणाले, जालना शहरात या जागतिक दर्जाच्या प्रयोगशाळेचे होणारे उद्घाटन हे निदानातील अचूकता आणि सुपर-स्पेशालिटी पॅथॉलॉजीची तज्ज्ञता दूरदूरच्या कोपऱ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या आमच्या सध्याच्या मिशनला अनुरूप आहे. टियर २ आणि टियर ३ शहरांमध्ये दर्जेदार निदान सेवांची उपलब्धता मर्यादितच आहे, आणि या नवीन प्रयोगशाळेच्या स्थापनेमुळे, आम्ही या कमतरतेवर उपाय योजून ती दूर करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. जालनामध्ये अशी सुविधा असणे हे निश्चितच शहराच्या आरोग्य सेवा प्रणालीसाठी वरदान सिद्ध होईल. शिवाय, आजूबाजूच्या गावांतील रहिवाशांना यामुळे त्यांच्या घरापासून वाजवी अंतरावर सर्वोत्तम निदान सेवा,अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि तज्ज्ञ वैद्यकीय व्यावसायिक उपलब्ध होतील.

मेट्रोपॉलिस हेल्थकेअर (पुणे आणि उर्वरित महाराष्ट्र) च्या लॅबोरेटरी ऑपरेशन्सच्या प्रमुख डॉ. स्मिता सुडके म्हणाल्या की, मेट्रोपॉलिस डायग्नोस्टिक टेस्टिंग सेंटर हे सर्वसामान्य दैनंदिन पॅथॉलॉजी चाचण्यांपासून ते सर्वात क्लिष्ट अशा मोलेक्युलर डायग्नोस्टिक टेस्ट्सपर्यंतच्या विस्तृत चाचण्या निश्चित करून वाजवी दरात त्यांचा अहवाल देण्यासाठी पूर्णपणे सुसज्ज आहे. आमच्या आधुनिक तंत्रज्ञान आणि कुशल व्यावसायिकांसह, आम्ही अचूक निदान आणि रुग्णकेंद्रित आरोग्यसेवेत नवीन मापदंड स्थापन करण्यास तयार आहोत.

लोकारोग्य

संकलन-संयोजन

सुशीलकुमार

susheelkumar80@yahoo.com

शब्दखेळ - ६५४

खाली दिलेल्या चौकोनात एका देशाचे नाव लपलेले आहे शोधा पाहू.

भू	क	व	प	मा	वि	र	न
तू	ग	पि	ब	आ	ता	ध	व
ण	ह	क	मी	ठ	ड	म	णा
ने	गा	ळी	हि	त	ल	ढा	रं
सो	मा	थ	न	ल	ल	क्स	गी
प	क	व	ता	ज	श	र	बा
ल	ती	बा	बा	लो	वा	की	चु
ग	भा	त्या	त	मा	चु	र	टी

शब्दखेळ - ६५३ चे उत्तर

रा	मि	यु	य	ला	श	श्व	को
ठ	जो	शि	जी	डू	ज्ञ	ग	व
णा	सा	क	ह	ले	भा	व	श
ना	य	सु	ह	ट	सु	ना	ले
लि	ज	के	बा	र	ग्रा	म	र
म	शे	मे	र	डी	मो	सा	क
दा	ड	थी	त	ह	का	ळी	त
स	चा	ल	दे	रे	मे	र्मा	डी

उत्तर - राकेश शर्मा -

जयंती भक्तिभावात साजरी; प्रभात फेरीचे आयोजन

गुरुनानक देवजींच्या जयघोषाने तारकपूर दुमदुमले

समाचार/नगर-दि.२५



'बोले सो निहाल... सत श्री अकाल'चा जयघोष, पारंपरिक वाद्यांचा निनाद, गुरुबाणीचे स्वर आणि भक्तिमय वातावरण... अशा मंगलमय वातावरणात अहिल्यानगर शहरात शीख धर्माचे संस्थापक गुरुनानक देवजी यांची ५५७ वी जयंती अर्थात गुरुपुरब मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. गुरुनानक देवजींच्या विचारांचा जयघोष करीत शीख, पंजाबी व सिंधी समाजबांधवांनी काढलेल्या भव्य प्रभात फेरीने तारकपूर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. यावेळी आहुजा परिवाराच्या वतीने प्रभात फेरीतील भाविकांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

मंगळवारी (दि. २४ नोव्हेंबर) सकाळी तारकपूर येथील भाई कुंदनलालजी गुरुद्वारा येथून पारंपरिक वाद्यांच्या गजरात प्रभात फेरीला प्रारंभ झाला. यामध्ये शीख, पंजाबी व सिंधी समाजातील पुरुष, महिला आणि युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हातात धार्मिक ध्वज, मुखी गुरुबाणी आणि ओठांवर गुरुनानक देवजींचा जयघोष करीत भाविकांनी संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण केले.

तारकपूर परिसरातून मार्गक्रमण करीत प्रभात फेरी टॉपअप पेट्रोल पंप येथे पोहोचली असता जनक आहुजा परिवाराच्या वतीने तिचे स्वागत करण्यात आले. यावेळी प्रभात फेरीतील वाहनावर विराजमान असलेल्या गुरुनानक देवजींच्या प्रतिमेवर तसेच धार्मिक पोथीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. गुरुनानक देवजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित भाविकांनी सामुदायिक अरदास (प्रार्थना) करीत सर्वांच्या सुख, समृद्धी, आरोग्य आणि शांततेसाठी प्रार्थना केली. या स्वागत सोहळ्यामुळे परिसरात उत्साहाचे आणि भक्तीचे वातावरण निर्माण झाले होते.

याप्रसंगी जनक आहुजा, इंद्रजीत नय्यर, राजेंद्र कंत्रोड, बृजमोहन कंत्रोड, हरजितसिंह वधवा, बबलू आहुजा, रिकी कंत्रोड, संजय आहुजा, दिनेश कंत्रोड, जतिन आहुजा, अभिमन्यू नय्यर, किशोर कंत्रोड, अनिश आहुजा, मनमोहन चोप्रा, गौरव कंत्रोड, पियुष कंत्रोड, सौरभ आहुजा, लव खंडुजा, कुश खंडुजा, तनिश कंत्रोड, अक्षय खुराणा, गुनित कंत्रोड, सागर कुमार आदींसह समाजबांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, गुरुनानक देवजी यांच्या जयंतीनिमित्त मागील सात दिवसांपासून शहरातील विविध गुरुद्वारांसह तारकपूर येथील भाई कुंदनलालजी गुरुद्वारा येथे विविध धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अखंडपाठ, कीर्तन दरबार, प्रवचन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि लंगर यांचा समावेश होता. या सर्व कार्यक्रमांना भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभाग नोंदविला. कीर्तन आणि प्रवचनांच्या माध्यमातून गुरुनानक देवजी यांनी दिलेला मानवतेचा, समतेचा, बंधुभावाचा, सेवाभावाचा आणि एकतेचा संदेश समाजबांधवांपर्यंत पोहोचविण्यात आला. त्यांच्या विचारांचे स्मरण करीत समाजातील सर्व घटकांनी प्रेम, सद्भावना आणि परस्पर सहकार्याची भावना जपावी, असा संदेश या जयंती उत्सवातून देण्यात आला. प्रकाश गुरुपुरबनिमित्त सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांनी गुरुद्वारा भाई दया सिंगजी, गोविंदपुरा येथे भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी त्यांनी शीख समाजबांधवांना गुरुनानक देवजी यांच्या जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक मोहित पंजाबी, जितू गंभीर, संजय चोपडा, बाली बांगरे, प्रा. माणिक विधाते, बाळासाहेब बारस्कर आदी उपस्थित होते.

यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले की, गुरुनानक देवजी यांनी समाजातील वंचितांची सेवा करण्याचा संदेश दिला.



हजारो दिव्यांचा दीपोत्सव; भाविकांची दर्शनासाठी रीघ

कार्तिक पौर्णिमेनिमित्त अय्यप्पा मंदिर उजळले

समाचार/नगर-दि.२५

कार्तिक पौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त अहिल्यानगर येथील भगवान श्री अय्यप्पा मंदिरात हजारो दिवे प्रज्वलित करून दीपोत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात आला. हजारो पणत्यांच्या प्रकाशाने मंदिर परिसर उजळून निघाला होता. आकर्षक रोषणाई, दीपमाळा आणि भक्तिमय वातावरणामुळे मंदिर परिसरात मंगलमय व प्रसन्न वातावरण निर्माण झाले होते.

कार्तिक पौर्णिमेनिमित्त आयोजित या दीपोत्सवात शेकडो भाविकांनी सहभागी होत भगवान श्री अय्यप्पा स्वामींचे दर्शन घेतले. मंदिर परिसरात रांगोळ्या, विद्युत रोषणाई ची विशेष सजावट करण्यात आली होती. प्रज्वलित दिव्यांच्या लखलखाटात मंदिराचे मनोहारी स्वरूप भाविकांचे लक्ष वेधून घेत होते. दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. अय्यप्पा सेवा समितीच्या पदाधिकाऱ्यांनी भाविकांची दर्शनाची व महाप्रसादाची व्यवस्था केली होती.

कार्तिक स्वामींचे बंधू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भगवान श्री अय्यप्पा स्वामींच्या दर्शनाला कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी विशेष महत्त्व असल्याची भाविकांची श्रद्धा आहे. त्यामुळे या मंगलदिनी अनेक भाविकांनी मोर पीस अर्पण करून दर्शनाचा आणि दीपोत्सवाचा लाभ घेतला.

हजारो दिव्यांच्या प्रकाशात मंदिर परिसर 'स्वामीये शरणम् अय्यप्पा'च्या जयघोषाने भक्तिमय झाला होता. दीपोत्सवामुळे कार्तिक पौर्णिमेचा उत्सव अधिकच मंगलमय आणि अविस्मरणीय ठरला. यावेळी अय्यप्पा सेवा समितीचे अध्यक्ष बाबुशेठ टायरवाले, उपाध्यक्ष राजू लक्ष्मण, सचिव वसंत सिंग व संचालक उपस्थित होते.

मराठा वधू-वर परिचय मेळाव्याचे उद्घाटन

समाचार/नगर-दि.२५



जगदंब फाउंडेशन व मराठा सोयरीक संस्थेने मोठ्या प्रमाणात एकल महिलांचे प्रश्न सोडवलेले आहेत व अनेक वधू-वरांचे लग्न जमवलेले आहेत, हे खूप मोठे पुण्याचे कार्य या संस्था करत आहेत, असे उद्गार खासदार निलेश लंके यांनी नगर शहरात हॉटेल यश ग्रँड मध्ये मराठा वधू वर परिचय मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी काढले. अखंड मराठा समाज व मराठा सोयरीक संस्था आयोजित संस्थेचा ११३ वा मोफत मराठा वधू वर परिचय मेळावा हॉटेल यश ग्रँड येथे पार पडला.

यावेळी उद्घाटन प्रसंगी खासदार निलेश लंके, जिल्हा परिषदेचे माजी सभापती बाळासाहेब हराळ ,विद्यमान नगरसेवक योगीराज गाडे , महेशभाऊ गाडे,अध्यक्ष अशोक कुटे, जगदंब फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश शिवाजी लंघे, संस्थेच्या संचालिका जयश्री कुटे, भारतीय कामगार सेनेचे राज्य सहचिटणीस मधुकर निकम, पारुनाथ ढोकळे, प्रा .संभाजीराव भोसले, गोरक्षनाथ पटारे, मराठासेवक मनोज सोनवणे, प्रतिभा काळे, प्रिती लंघे, शांतीलाल कोहक, सागर मोरे,डव्होकेट संदीप काळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या मेळाव्यासाठी गाडे परिवाराचे बहुमोल असे सहकार्य मिळाले.

भारतीय कामगार सेनेचे राज्य सहचिटणीस मधुकर निकम व प्राध्यापक संभाजीराव भोसले यांनी वधू-वर पालकांना लग्न जमवण्याबाबत मार्गदर्शन केले. जयश्री अशोक कुटे यांनी सर्व बायोडाटा वाचन करून वधू-वर पालकांच्या विविध प्रश्नांचे निरसन केले. प्रतिभा काळे यांनी उत्कृष्ट सूत्रसंचालन केले. या मेळाव्यासाठी नगर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांसह इतर जिल्ह्यांमधूनही वधू-वर पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मेळाव्यातून ४ विवाह निश्चित होतील,असा विश्वास संस्थेने व्यक्त केला आहे. स्थळे व पुढील मेळाव्यांच्या माहितीसाठी ७०२०२८१२८२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

जिल्हास्तरीय निवड चाचणी उत्साहात; १९१ कुस्तीपटूंचा सहभाग

कुस्तीगीरांचा मॅटवर कुस्त्यांचा थरार

समाचार/नगर-दि.२५



अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघाच्या वतीने भिस्तबाग, पवननगर येथील संभाजी महाराज कुस्ती केंद्रात १५ व २० वर्षे वयोगटातील फ्रीस्टाइल व ग्रीको रोमन राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेसाठी जिल्हास्तरीय निवड चाचणी मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या निवड चाचणीत १५ वर्षे वयोगटात १०९, तर २० वर्षे वयोगटात ८२ अशा एकूण १९१ कुस्तीपटूंनी सहभाग नोंदविला. मॅटवर रंगलेल्या चुरशीच्या लढतींमुळे उपस्थितांना कुस्तीचा थरार अनुभवायला मिळाला.

आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली डिसेंबर महिन्यात शहरात राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धे चे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणारा संघ निवडण्यासाठी ही चाचणी घेण्यात आली. जिल्ह्यातील युवा कुस्तीपटूंना राज्यस्तरावर आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळावी, हा या निवड चाचणीमागील उद्देश आहे.

जिल्हा कुस्तीगीर संघाचे सचिव संतोष भुजबळ यांनी मार्गदर्शन केले. जिल्हा कुस्तीगीर संघाचे खजिनदार शिवाजी चव्हाण म्हणाले की, संभाजी महाराज कुस्ती केंद्रात जिल्हास्तरीय फ्रीस्टाइल व ग्रीको रोमन कुस्ती स्पर्धे ची निवड चाचणी उत्साहात पार पडली. या स्पर्धेत जिल्ह्यातील १९१ कुस्तीपटूंनी सहभाग घेतला. कुस्तीपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी आमदार संग्राम जगताप यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे. या निवड चाचणीप्रसंगी कुस्तीगीर संघाचे सचिव संतोष भुजबळ, खजिनदार पैलवान शिवाजी चव्हाण, नितीन आव्हाड, निलेश मदने, संग्राम शेळके, प्रमोद गोडसे, शंकर खोसे, युवराज चव्हाण आदींसह खेळाडू, पालक आणि कुस्तीप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



घोसपुरीत दुहेरी देशसेवा बजावणाऱ्या माजी सैनिकांचा सत्कार

समाचार/नगर-दि.२५

सैन्य दलातून निवृत्त झाल्यानंतर पुन्हा महाराष्ट्र शासनाच्या सरळ सेवेतून निवड होऊन कर्तव्यावर रुजू झालेल्या दुहेरी देशसेवा करणाऱ्या माजी सैनिकांचा सत्कार सोहळा घोसपुरी (ता.नगर) येथे आयोजित करण्यात आला होता. श्री पद्मावती आजी-माजी सैनिक सेवा संस्था व श्री पद्मावती आजी-माजी सैनिक संघटना, घोसपुरी यांच्या वतीने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या सत्कार सोहळ्यात माजी सैनिक बाळासाहेब घोडके, संतोष झरेकर, सुभाष झरेकर, मिठू झरेकर, सतीश वाळके, जालिंदर निमसे आणि तात्याराम लांडगे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. आधी भारतीय सैन्य दलात सेवा देऊन निवृत्त झाल्यानंतर आणि त्यानंतर शासनाच्या सेवेत पुन्हा कार्यरत राहून दुहेरी जबाबदारी पार पाडणाऱ्या या मान्यवरांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा सोहळा ठेवण्यात आला होता. घोसपुरी येथील सैनिक भवन येथे झालेल्या या सत्कार सोहळ्यास श्री पद्मावती आजी-माजी सैनिक सेवा संस्था व श्री पद्मावती आजी-माजी सैनिक संघटना, घोसपुरी यांचे पदाधिकारी, सदस्य तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. या निमित्ताने तरुण पिढीला प्रेरणा मिळावी त्यांच्या मनात देशसेवेची भावना निर्माण व्हावी या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.

विहिंपतर्फे २७ रोजी रक्तदान शिबीर

समाचार/नगर-दि.२५

शहीद कारसेवक राम कोठारी व शरद कोठारी बंधूंच्या बलिदान स्मृतीस अभिवादन म्हणून विश्व हिंदू परिषदेच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. विश्व हिंदू परिषद, मंदिर अर्चक पुरोहित आयाम विभाग प्रमुख गजेंद्र सोनवणे यांच्या जन्मदिनानिमित्त या शिबिराचे आयोजन जनकल्याण रक्तकेंद्र, नालेगाव, अहिल्यानगर येथे करण्यात आले असून हे शिबीर दि. २७/११/२०२६ रोजी सकाळी ११ते५या वेळी* होणार आहे.

बजरंग दलाच्या वतीने शहीद कोठारी बंधूंच्या बलिदानाला ही मानवसेवेतून आदरांजली वाहण्यात येणार आहे.या रक्तदान शिबिरात जास्तीत जास्त रक्तदात्यांनी सहभागी होऊन शहीद कारसेवकांना अभिवादन करावे व गजेंद्र सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक कार्यात हातभार लावावा,व मोठ्या संख्येने रक्तदान शिबिरात सहभागी व्हावे. असे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे जिल्हामंत्री अनिल जोशी,प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर,जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर,सह प्रमुख हरिभाऊ डोळसे प्रखंड मंत्री बाली जोशी यांनी केले आहे.

मित्रमंडळातर्फे जगताप, कोठारी, पांडुळे सन्मानित

स्व. अरुण जगताप यांच्या स्मृतींना सत्कार समारंभात उजाळा



समाचार/नगर-दि.२५

महात्मा फुले चौकातील अरुणकाका मित्रमंडळाच्या वतीने जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल सचिन जगताप, हिंद सेवा मंडळाच्या मानद सचिवपदी निवड झाल्याबद्दल सुमतीलाल कोठारी व महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नगर शाखेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ज्ञानदेव पांडूळे या तिघांचा सत्कार करण्यात आले. या कार्यक्रमास आ.संग्राम जगताप, राजेंद्र चोपडा, बडीसाजन ओसवाल संघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा, अशोक गांधी, हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष ॲड.अनंत फडणीस, ज्ञानेश्वर रासकर, डॉ.विजय भंडारी व प्रा.माणिक विधाते यांच्यासह अरुणकाका मित्रमंडळाचे सदस्य व विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सत्कार सोहळ्यात स्व.अरुणकाकांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला.

आमदार संग्राम जगताप यांनी मनोगतातून जिल्हा सहकारी बँक, हिंद सेवा मंडळ व महाराष्ट्र साहित्य परिषद या तिन्ही संस्थांच्या कार्याचा गौरव केला. ते म्हणाले, आजच्या परिस्थितीत संस्था चालवणे व ती प्रगतीपथावर नेणे फार कठीण काम आहे. सर्व अडचणींवर मात करत या तिन्ही संस्था आपापल्या क्षेत्रात उत्कृष्ट काम करत आहेत. हिंदसेवा मंडळ शैक्षणिक क्षेत्रात जिल्ह्यात मोलाचे योगदान देत आहे. सर्वसामान्य विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण देण्याबरोबरच सर्व सुविधा देण्यासाठी सुमतीलाल कोठारी यांच्यासह सर्व पदाधिकारी कायम तत्पर व प्रयत्नशील असतात. ऐतिहासिक संस्थेचे अध्यक्षपदाची जबाबदारी ज्ञानदेव पांडुळे यांना मिळणे हे आनंददायी आहे. स्व.अरुणकाका जगताप यांचा वारसा संचालक पदाच्या माध्यमातून सचिन जगताप पुढे नेत आहेत. सहकार क्षेत्रातही ते चांगले काम करून योगदान देतील.

सचिन जगताप, ज्ञानदेव पांडुळे, सुमतीलाल कोठारी यांनीही मनोगत व्यक्त करून सत्कार केल्याबद्दल सर्वांचे आभार मानले. राजेंद्र चोपडा यांनी जुन्या आठवणींचा उजाळा दिला. तसेच ज्ञानेश्वर रासकर, अजित कर्नावट, प्रेमराज बोथरा यांच्यासह विविध वक्त्यांनी अरुणकाका जगताप यांच्या आठवणींना उजाळा देत तिन्ही सत्कारमूर्तींचे कार्याचा गौरव व अभिनंदन केले. नगरसेवक प्रकाश भागानगरे यांनी प्रास्ताविक क सूत्रसंचालन केले. मर्चंट्स बँकेचे चेअरमन संजय चोपडा यांनी आभार मानले. यावेळी अरुणकाका मित्रमंडळाचे सदस्य राजू शेटीया, पप्पू मुंदडा, बाळासाहेब धाडीवाल, चंद्रकांत औशीकर, विनोद नारंग, जय रंगलानी, लकी खूपचंदानी, अजित बोरा, किशोर मुथा, राजू छाजेड, विनोद कटारिया, संजय ताठेड, मंगेश खताळ, मनीष फुलडालिया, राजेंद्र बोथरा, कांता अष्टेकर, भाऊ हुच्चे, राजेश भंडारी यांच्यासह सदस्य उपस्थित होते.

दिव्यांगांच्या हक्कांसाठी विळदघाट येथे विशेष कार्यशाळा

समाचार/नगर-दि.२५



दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या कायदेशीर हक्कांची जाणीव व्हावी, त्यांना आरोग्य सुरक्षेचे कवच मिळावे आणि शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेता यावा, या उद्देशाने डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन संचालित जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, विळदघाट यांच्या वतीने विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र (डीडीआरसी), विळदघाट येथे ही कार्यशाळा होणार आहे. केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. मात्र, योजनांची पात्रता, आवश्यक कागदपत्रे, अर्ज करण्याची पद्धत आणि प्रशासकीय प्रक्रियेची पुरेशी माहिती नसल्याने अनेक पात्र लाभार्थी योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. विशेषतः ग्रामीण भागातील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांपर्यंत या योजनांची माहिती पोहोचविणे, त्यांच्यामध्ये जनजागृती निर्माण करणे आणि योग्य मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, हा कार्यशाळेचा मुख्य उद्देश आहे. या कार्यशाळेत दिव्यांगांसाठी सर्वकाही फ या पुस्तकाचे लेखक तथा महाराष्ट्र राज्य दिव्यांग आर्थिक विकास महामंडळ, मुंबईचे सेवानिवृत्त महाव्यवस्थापक नंदकुमार फुले हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. आपल्या प्रदीर्घ प्रशासकीय अनुभवाच्या आधारे ते दिव्यांग व्यक्तींचे कायदेशीर हक्क, पालकत्वासंबंधी कायदेशीर तरतुदी, आरोग्य विमा योजना आणि त्यासंबंधित प्रक्रियांविषयी मार्गदर्शन करणार आहेत. दिव्यांग व्यक्तींच्या पालकांसमोर त्यांच्या पश्चात पाल्याची काळजी कोण घेणार, त्याच्या आर्थिक व कायदेशीर हितांचे संरक्षण कसे होणार आणि आवश्यक निर्णय घेण्यासाठी त्याला योग्य सहाय्य कसे उपलब्ध होणार, असे अनेक प्रश्न असतात. राष्ट्रीय न्यास अधिनियम, १९९९ आणि दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ यांमधील तरतुदींच्या अनुषंगाने कायदेशीर पालकत्व तसेच निर्णयप्रक्रियेसाठी आवश्यक सहाय्याबाबत कार्यशाळेत माहिती दिली जाणार आहे.

बाबासाहेब पाटील ; सभासदांना ठेव पावती वितरणाचा शुभारंभ

विश्वासार्हतेमुळे 'मर्चंटस्' यशोशिखरावर



समाचार/नगर-दि.२५

सहकारी बँकिंग क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या अहमदनगर मर्चंटस् को ऑप. बँकेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सभासदांना प्रत्येकी ५१०० रूपयांची मुदत ठेव पावती भेट दिली जात आहे. या मुदत ठेव पावती वितरणाचा ऐतिहासिक शुभारंभ सोहळा मंगळवारी यशवंतराव चव्हाण सहकार सभागृहात राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील व मर्चंटस बँकेचे संस्थापक चेअरमन व विद्यमान ज्येष्ठ संचालक हस्तीमल मुनोत यांच्या हस्ते झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. संग्राम जगताप होते. ११ सभासदांना प्रातिनिधिक स्वरूपात ठेव पावती देण्यात आली.

याप्रसंगी महापौर ज्योती गाडे, जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे, मर्चंटस बँकेचे चेअरमन संजय चोपडा, व्हाईस चेअरमन अमित मुथा, सुवर्ण महोत्सव वर्ष कमिटीने स्वागताध्यक्ष अनिल पोखरणा, संचालक कमलेश भंडारी, आनंदराम मुनोत, संजय बोरा, किशोर गांधी, सीए आयपी अजय मुथा, सीए मोहन बरमेचा, किशोर मुनोत, संजीव गांधी, प्रमिलाबाई बोरा, मीना मुनोत, विजय कोथिंबीरे, सुभाष बायड, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य राजेश झंवर, पेमराज बोथरा, सीए प्रवीण कटारिया, सीईओ नितीन भंडारी, कर्मचारी प्रतिनिधी जितेंद्र बोरा, प्रसाद गांधी, महिला व बालकल्याण अंतर्गत कमिटी सदस्या मनीषा गुगळे, नगरसेवक प्रकाश भागानगरे, माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे, मर्चंटस व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष अशोक गांधी, सेक्रेटरी संतोष बोरा, राजेंद्र गांधी, वारकरी संप्रदायाचे राऊत अण्णा, सतीश लोढा, माळीवाडा येथील श्री विशाल गणपती देवस्थानचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते, अशोक कानडे आदींसह आजी माजी नगरसेवक, विविध क्षेत्रातील मान्यवर, सभासद, खातेदार, ठेवीदार, व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सहकारमंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले, सहकारी चळवळीची सुरुवात अहिल्यानगर जिल्ह्यात झाली व ती पुढे देशभरात फोफावली. हस्तीमल मुनोत यांनीही सहकाराचे एक मोठे स्वप्न पाहून मर्चंटस बँक स्थापन केली. आज पन्नास वर्षांनंतरही बँक यशोशिखरावर दिमाखात उभी आहे. बँकेची भक्कम आर्थिक स्थिती आणि प्रगती पाहून खूप आनंद होतो. सातत्याने सभासदांना १५ टक्के लाभांश देणे ही सोपी गोष्ट नाही. हे काम मर्चंटस बँकेने करून दाखवले. योग्य कर्जवाटप करून अनेकांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यात या बँकेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. विश्वासार्हता हे या बँकेचे वैशिष्ट्ये आहे. चेअरमन संजय चोपडा यांची बँकेप्रती असलेली तळमळ खूप जवळून पाहिली. सर्व संचालक मंडळ अतिशय शिस्तबद्ध कारभार करून बँकेची प्रतिष्ठा जपत आहे.

आ. संग्राम जगताप म्हणाले, बँकांचे अस्तित्व विश्वासावर टिकून असते. कर्ज देताना खूप काळजी घ्यावी लागते. नगरमध्ये विश्वास आणि मर्चंटस बँक हे समीकरण पन्नास वर्षांनंतरही कायम आहे. चेअरमन होताच संजय चोपडा यांनी सभासदांना ५१०० रूपये ठेव पावती देण्यासाठी विशेष प्रयत्न करून आज हा कार्यक्रम घेतला. बँक आणखी शिखरावर नेण्याचे काम सर्व संचालक मंडळ निश्चितपणे करेल असा विश्वास आहे.

चेअरमन संजय चोपडा म्हणाले, बँकेचे संस्थापक चेअरमन हस्तीमलजी मुनोत यांनी बँकेच्या सुवर्ण जयंती वर्षानिमित्त सभासदांना ५१०० रूपयांची ठेव पावती देण्याचे स्वप्न पाहिले होते. तेव्हापासून आवश्यक परवानग्या मिळवण्यासाठी प्रयत्न चालू केले. मी चेअरमन झाल्यावर प्राधान्याने हे काम हाती घेतले. आ. संग्राम जगताप यांच्या माध्यमातून सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्याकडे सतत पाठपुरावा केला व त्यांनी आवश्यक मंजुरी दिली. एक मोठे कार्य माझ्या हातून झाले हे माझे भाग्य आहे.

स्वागताध्यक्ष अनिल पोखरणा म्हणाले, बँकेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त ३१ मार्च २०१४ पूर्वीच्या सभासदांना तब्बल चार कोटी ७५ लाख रुपयांच्या ठेव पावत्यांचे वितरण होणार आहे. बँकेचा सुवर्ण महोत्सवही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा झाला होता. सभासदांना संस्मरणीय भेट देण्यासाठी आवश्यक मंजुरी मिळण्यासाठी संचालक मंडळाने निर्धारपूर्वक यासाठी पाठपुरावा केला. त्यामुळे आवश्यक परवानग्या मिळाल्या आणि आज खऱ्या अर्थाने हा ऐतिहासिक कार्यक्रम होत आहे. संस्थापक चेअरमन हस्तीमल मुनोत यांच्या वतीने किशोर मुनोत यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले, मर्चंटस बँकेच्या इतिहासातील हा सुवर्ण क्षण आहे. स्थापनेपासून विश्वास जपत शिस्तबद्ध कारभार करत बँकेने प्रगती साधली आहे. बँकेने यापूर्वी रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त सभासदांना २५०० रूपयांची ठेव पावती तर ४१ व्या वर्षानिमित्त ४१०० रूपयांची ठेव पावतीची भेट दिली होती. आता सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सभासदांना ५१०० रूपयांची ठेव पावती देण्यात येत आहे, याचा विशेष आनंद वाटतो. व्हाईस चेअरमन अमित मुथा यांनी आभार मानताना सांगितले की, सर्व पात्र सभासदांनी १ डिसेंबर २०२६ पासून आपल्या मुदत ठेव पावत्या बँकेच्या मार्केट यार्ड शाखेतून घेऊन जाव्यात. सूत्रसंचालन प्रा. प्रसाद बेडेकर यांनी केले.

शैक्षणिक ॲकॅडमीसाठी
रिसेप्शनिस्ट पाहिजे
* पात्रता *
किमान ग्रॅज्युएट,संभाषण कौशल्य आवश्यक
(महिला/मुलींना प्राधान्य)
-: संपर्क :-
8805087857

UNITED PHARMA
Pharmaceutical Distributors
Near Kedgaon Ves, Kedgaon
9049934444

॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥



स्व. विजयसिंग किसनसिंग परदेशी
ज्येष्ठ संचालक - सहकारी ग्राहक भांडार

आपण संस्थेला दिलेले मोलाचे योगदान
कायम स्मरणात राहील...

सुरेंद्र भंडारी	शैलेश मुनोत	विक्रम फिरोदिया
जनरल मॅनेजर	व्हा.चेअरमन	चेअरमन

संचालक मंडळ

दादाभाऊ कळमकर, नरेंद्र फिरोदिया, अतुल भंडारी, प्रदिप बोरा, अरविंद गुंदेचा, राजेंद्र चोपडा, वैभव लांडगे, महेश रच्चा, श्रीमती छायाताई फिरोदिया, श्रीमती सुनंदाताई भालेराव, श्रीमती सुनिता सारसर, संतोष गांधी, सचिन डागा, प्रकाश गांधी (प्रशासन अधिकारी) व सर्व कर्मचारी वृंद

P2

अहमदनगर सेंट्रल को-ऑप. कंझ्युमर्स होलसेल रिटेल स्टोअर्स लि.
जुना दाणे डबरा, अहिल्यानगर.

ग्रामपंचायत कार्यालय खर्डा ता. जामखेड, जि. अहिल्यानगर

ब- १ सुचना

ग्रामपंचायत खर्डा यांच्या कार्यालयाकडून खाली दिलेल्या कामाचे नोंदणीकृत कंत्राटदार यांच्या कडून ब-१ निविदा मागविण्यात येत आहे आहेत.

अ क्रं	मंजुर कामाचे नांव	निवीदा रक्कम	निवीदा फी	अनामत रक्कम	काम पुर्ण करावयाचा कालावधी	योजनेचे नांव	ठेकेदार प्रकार
१)	मौजे खर्डा येथे गावठाण अंतर्गत भूमिगत गटार करणे	२,५२,१४०/-	२३६/-	१%	६ महिने	१५ वा वित्त आयोग	खुला

निविदा फॉर्म व कामाच्या अटी, शर्तीबाबतची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात दिनांक २५/११/२०२६ ते ०२/१२/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत (शासकीय सुट्टी वगळून) मिळतील. सिलबंद निविदा दिनांक ०२/१२/२०२६ रोजी वेळ सकाळी ११:०० वा. ते दुपारी ३:०० पर्यंत स्वीकारण्यात येतील. निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.निविदा उघडण्याची प्रक्रिया दिनांक ०३/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता ग्रामपंचायत कार्यालय खर्डा, ता. जामखेड जि. अहिल्यानगर येथे पार पडेल.निविदा सोबत :-१. नोंदणी प्रमाणपत्र २. कामाचा अनुभव ३. पॅनकार्ड ४. जीएसटी प्रमाणपत्र व आवश्यक कागदपत्र जोडावीत.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत खर्डा, ता. जामखेड जि. अहिल्यानगर

प्रशासक

समर्पण चातुर्मासचा भक्तिभावाने समारोप

नगरचा चातुर्मास ऐतिहासिक -प्रवीणऋषीजी



समाचार/नगर-दि.२५

गुरूदेवांच्या आशीर्वादाने त्यांच्या कर्मभूमीतील चातुर्मास खूप आनंददायी ठरला. जी भक्ती, सेवा, समर्पण भाविकांमध्ये दिसली ती अद्भूत होती. धर्मसभेची रौनक भाविकांनी वाढवली. चार महिने निरंतर तोच उत्साह, उल्हास दिसून आला. नगरमध्ये २००७ मध्ये नवकार कलशपासून सुरू झालेली ही यात्रा नगरकरांच्या अपार प्रेमाची होती. चातुर्मास कमिटीच्या समर्पणामुळे हा चातुर्मास खऱ्या अर्थाने ऐतिहासिक ठरला आहे, अशा भावना उपाध्याय प्रवर पूज्य प्रवीणऋषीजी म.सा. यांनी व्यक्त केल्या.

आनंदधाम परिसरातील आनंद तीर्थ समवशरण येथे सुरू असलेल्या समर्पण चातुर्मासाची सांगता मंगळवारी झाली. याप्रसंगी महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., आलोकऋषीजी म.सा., तिर्थेशऋषीजी म.सा., विनिताश्रीजी म.सा., अमितज्योतीजी म.सा. आदी साधू साध्वीजींच्या सान्निध्यात समारोप कार्यक्रम झाला. याप्रसंगी आमदार संग्राम जगताप, समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, पुणे येथील प्रसिद्ध डॉ.कल्याण गंगवाल आदी उपस्थित होते.

समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी उद्योगपती सौरभ प्रमिलाताई हेमराज बोरा व बोरा परिवार होता.

प्रवर्तक कुंदनऋषीजी महाराज म्हणाले, उपाध्यायश्रीजींचा गुरूदेवांच्या कर्म भूमीतील चातुर्मास अद्वितीय व ऐतिहासिक आहे. त्यांच्यासारखी साधना करणे खरच अद्भूत आहे. भव्य स्वरुपातील तपश्चर्या यावर्षी झाली ती कौतुकास्पद आहे. असा चातुर्मास दरवर्षी झाला पाहिजे.

आ. संग्राम जगताप म्हणाले, पूज्य प्रवीणऋषीजी महाराज यांच्या चातुर्मासामुळे चार महिने संपूर्ण शहरात भक्तिमय वातावरण तयार झाले. या काळात अनेक मार्गदर्शन शिबिरे झाली. प्रत्येक व्यक्तीला या काळात चांगले विचार मिळाले. चातुर्मास कमिटीने खूप उत्तम व्यवस्था केली. सौरभ बोरा व मित्र परिवारानेही खूप मोठे योगदान दिले. अशोक बोरा म्हणाले, गुरूदेवांचा चातुर्मास घोषित झाला आणि आम्ही ट्रस्ट मंडळ निर्माण केला. सर्व समर्पित ट्रस्टी यात जोडले गेले. गुरूकृपेने आम्ही एकसंघ राहून काम केले. गुरूदेवांनी विश्वासाने आम्हाला चातुर्मास प्रदान केला. या विश्वासाला खरे उतरण्याचा प्रामाणिक प्रयत्न आम्ही केला.

आदेश चंगेडिया म्हणाले, समर्पण चातुर्मास काळाऊ कमिटीच्या वतीने काही कमतरता राहीली असेल तर क्षमा मागतो. आमचे एक ध्येय एकच होते की चातुर्मास सर्वोत्तम आणि कायम संस्मरणीय असा झाला पाहिजे. गुरूदेवांचे अनमोल मार्गदर्शन याकाळात मिळाले. मला सर्व सहकारी ट्रस्टींचेही खूप मोठे सहकार्य लाभले. कमिटीचे ट्रस्टी सचिन देसरडा, राजेश भंडारी यांनीही मनोगत व्यक्त करून चातुर्मास कमिटीला सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.



अहिल्यानगर येथील सनातन धर्म सभेच्या वतीने कार्तिकी पौर्णिमेच्या निमित्ताने काळेश्वर मंदिरात दीप महोत्सव साजरा करण्यात आला यावेळी सनातन धर्म सभेचे उपाध्यक्ष नीलकंठ देशमुख उपाध्यक्ष , दिनकरराव देशमुख महामंत्री, सनातन धर्मसभ पदाधिकारी सर्वश्री राजेंद्र नगरकर, श्रीपाद तांबोळी, वे.मू.उमेश वाळुंजकर पं.चकोर मुळे, अनंत देशपांडे, समीर उपाध्ये आदि. उपस्थित होते.

टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात
दि.२०/११/२०२६ ते दि.२६/११/२०२६



RAMAYANA (हिंदी) (3D)	7.00 AM I 10.45 PM I 02.30 PM 06.15 PM I 10.00 PM
RAMAYANA (हिंदी) (2D)	8.30 AM I 09.30 PM I 01.30 PM 05.15 PM I 07.15 PM I 09.00 PM 11.00 PM
O.M. OPERATION MOLE (हिंदी)	10.15 AM I 03.30 PM I 09.30 PM
आदि अनंत (मराठी)	12.30 AM
मैत्रेया (मराठी)	05.00 PM
बंधू (मराठी)	01.45 PM
जिजाई (मराठी)	04.45 PM

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher *
- Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar's First & Most Luxurlous Cinematic Paradise
book my show CONNPLEX book my show
3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002

प्रयत्न नर्सिंग कॉलेज, अहिल्यानगर
Govt. of Maharashtra / MSBNPE
शैक्षणिक वर्ष २०२६-२७

संस्थास्तरीय प्रवेश प्रक्रियेसाठी / रिक्त जागांवर (Residual Vacancy) प्रवेशासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांकडून CAP प्रक्रियेनुसार GNM व ANM अभ्यासक्रमासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

अ.क्र.	तपशील	दिनांक / कालावधी
१	संस्थास्तरीय प्रवेशासाठी जागा वाटप व पात्र उमेदवारांची यादी जाहीर करणे.	२६/११/२०२६
२	पात्र इच्छुक उमेदवारांनी विहीत नमुन्यात महाविद्यालयात अर्ज सादर करणे.	२७/११/२०२६ ते २८/११/२०२६
३	सर्वसाधारण गुणवत्ता यादी व प्रवर्ग निहाय यादी (Selection List-1) प्रसिद्ध करणे.	२८/११/२०२६ संध्या ६.३० नंतर
४	Selection List-1 मधील विद्यार्थ्यांची प्रवेश निश्चिती व कागदपत्र पडताळणी तसेच मूळ कागदपत्रे जमा करणे.	२९/११/२०२६ संध्या ५.३० पर्यंत
५	उर्वरित रिक्त जागांची (Residual Vacancy) सूचना प्रसिद्ध करणे.	२९/११/२०२६
६	उर्वरित जागांसाठी पात्र उमेदवारांचा मूळ कागदपत्रांसह प्रवेश.	३०/११/२०२६ दुपारी २.३० वाजेपर्यंत
७	उर्वरित जागा भरणे (मेरिटनुसार).	३०/११/२०२६ दु. २.३० वाजेपासून
८	प्रवेशित उमेदवारांची माहिती College Feedback Module वर भरणे.	३०/११/२०२६
९	शै.व २०२६-२७ साठी ANM/ GNM प्रवेशासाठी अंतिम दिनांक (INC नुसार).	३०/११/२०२६

पात्रता - MSBNPE d Govt. of Maharashtra यांच्या नियम व अटीनुसार पात्रता निश्चित केली जाईल.

प्रशासक: (९८५०९३६५५८) संपर्क (९१६७७९५१९२) प्राचार्या: (७०२०४९२६६०)

पत्ता - प्रयत्न नर्सिंग कॉलेज, गुलमोहर पोलिस चौकीजवळ, श्रीराम चौक, वसंत टेकडी, पाईपलाईन रोड, गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर. (०२४१-२४२६७००)

अखंडित गरम पाण्यासाठीचा सोपा मार्ग



१७ वर्षांपासून ग्राहकांच्या सेवेत

Domestic
Heat Pump Water Heater

आदित्य एंटरप्राईजेस
गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर. मोबाईल नं. : 9325103781